नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २२८ * * नागपूर * सोमवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख
खरीखरी..

## आघाडी लढलीच नाही

लोकसभेच्या लढाईत महाराष्ट्रातील महाविकास आघाडी म्हणजेच भारतातील इंडिया अतिशय आक्रमकपणे जनतेच्या हृदयाला भिडणारे मुद्दे घेऊन लढली होती. सध्या देशाची गोष्ट जाऊ द्या. महाराष्ट्राचा विचार करूया. महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीसाठी जे जे मुद्दे वापरले. ते ते मुद्दे त्या त्या वेळी ताजे मुद्दे होते. त्यामुळेच लोकसभेच्या वेळी महाराष्ट्रात महायुतीला जोरदार लढणाऱ्या आघाडीकडून अत्यंत अनाकलनीय पराभव पत्करावा लागला होता. या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी महायुतीने किती घोषणा, योजना आणि कार्यक्रम कार्यक्रम दिले. त्याची जंत्री आम्ही कालच दिली होती. त्यात योजना आणि घोषणांचा वर्षाव करण्यात आला. त्या वर्षावाला थांबविण्यासाठी महाविकास आघाडीला जी छत्री हवी होती. ती महाविकास आघाडीकडून जनतेसाठी दिलीच गेली नाही. त्यानंतर मग त्या योजना आणि घोषणांच्या वर्षावात महाराष्ट्रातील जनता चिंब भिजून गेली. विशेष म्हणजे राहुल गांधींसहित महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांना हे कळलेच नाही. ही सर्व मंडळी लोकसभेच्या महाविजयाच्या नशेत इतकी बुडून गेली होती की, त्यांना साधा परिणामकारक प्रचार करणेही जमले नाही. राहुल गांधी यांच्यासह ज्या ज्या नेत्यांनी प्रचार करायचा होता. त्यांनी केवळ नकारात्मक मुद्दे हाती घेतले. संविधान वगैरेचे मुद्दे लोकसभा निवडणुकीच्या काळात एक वेळी चालले. पण महाराष्ट्राच्या सरकारने प्रत्यक्ष बहिणींच्या खात्यात साडेसात हजार रुपये जमा केले. विद्यार्थ्यांना निधी दिला. जातवार महामंडळे स्थापन केली. याविरुद्ध काँग्रेसने जो जाहीरनामा जनतेपुढे मांडला त्याची चर्चा खुद्द आघाडीवाल्यांनीही केली नाही. लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा जाहीरनामाच एनडीए साठी डोकेदुखी ठरला होता. काँग्रेसने ज्या ग्यारंट्या दिल्या होत्या. त्याआधी युती सरकारने त्या ग्यारंट्यावर ताण केली होती. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनी महाराष्ट्राला वेळच दिला नाही. महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेतेही कधीच संपूर्ण महाराष्ट्राचे नेते नव्हते. ते आपापल्या मतदारसंघातच दंड बैठका मारत होते. त्यापैकी थोरात पडले, पृथ्वीराज चव्हाण आडवे झाले. इतर स्थानिक महत्त्वाचे नेतेही पार आपली जागा गमावून बसले. महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांच्या जवळ ना प्रभावी वक्ते होते, ना प्रभावी मुद्दे होते. विदर्भ हा आपला बालेकिल्ला आहे, असे समजून आपण जिंकलोच आहोत. अशा अविभार्वात काँग्रेसचे नेते वावरत होते. एकीकडे संघ होता संघटना होती. दुसरीकडे एकसंघता कधीच नव्हती. परस्परांवर दुगाण्या झाडणे आणि सोलापूर सारख्या शहरात उघडपणे आघाडीच्या उमेदवारला पाठिंबा न देणे. असे प्रकार बऱ्याच ठिकाणी घडले. थोडक्यात लोकसभेच्या वेळी एनडीएकडे मुद्दे नव्हते. तर आपल्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत इंडिया म्हणजेच महाविकास आघाडीकडे मुद्देच नव्हते. जरांगे पाटील लाभदायी ठरतील असे ज्यांना ज्यांना वाटत होते, त्यांच्या त्यांच्या पदरी निराशाच पडली. जरांगेंचे मराठे भरभरून पावले नाहीत. मग इतरांची मते तर आपोआपच युतीकडे गेली. विधानसभा निवडणूक पूर्व काळात जाहिराती आणि प्रचारांच्या धुमधडाक्यात युतीने जी हुशारी दाखवली तिला तोड म्हणून आघाडीकडे काहीच नव्हते. मुंबईसारख्या शहरात महाराष्ट्र- गुजरात करून अमराठी मतदारांना आघाडीने स्वतःहून युतीच्या पारड्यात टाकून दिले होते. एकूणच महाराष्ट्राची ही निवडणूक दोन्हीही पक्षांना धडा देऊन गेली. या धड्याची चाहूल युतीला आधीच लागल्यामुळे त्यांनी धडाधड घोषणांचा धडाका लावला आणि बिचाऱ्या महाविकास आघाडीला पडापडीच्या आणि पाडापाडीच्या खेळात जोरात दमवून टाकले. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, आघाडीकडे तेच ते जुने चेहरे तोच तो त्यांचा गोतावळा आपापल्या निकटवर्तीयांना तिकीटे वाटता झाला. आता कितीही बोंबाबोंब केली तरी आघाडीच्या घटक पक्षाजवळ विरोधी पक्षनेताही राहणार नाही. दहा वर्षे जे लोकसभेत भोगले तोच कित्ता आता विधानसभेत आघाडीला गिरवावा लागेल. यातून शहाणपणा शिकले तर टिकले. नाही तर जनतेने फेकले आणि संपले असे होऊ शकते. आघाडीच्या शहाण्यांना अधिक उपदेश देऊन काही फायदा नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महायुतीचा आज शपथविधी?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता राज्यात युतीचे सरकार स्थापन होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. महायुतीकडून मुख्यमंत्री पदाचा उमेदवार अद्याप जाहीर झालेला नाही.



विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपत आहे, त्यामुळे त्यापूर्वी सरकार स्थापन करावे लागेल. तसे न झाल्यास राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करावी लागेल. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार रविवारी संध्याकाळी सरकारचा चेहरा अर्थात मुख्यमंत्र्यांचे नाव ठरवण्यासाठी दिल्लीला रवाना झाल्याची माहिती असून, भाजप हायकमांडसोबतच्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा होऊ शकते.

माहितीनुसार, सध्या एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांचा फॉर्म्युला ठरला आहे. त्याचवेळी महायुतीच्या पक्षांमध्ये प्रत्येक ६-७ आमदारांमागे एक मंत्रीपदाचा फॉर्म्युला निश्चित झाला आहे. त्यानुसार भाजपचे २२-२४, शिंदे गटाचे १०-१२ आणि अजित गटाचे ८-१० आमदार मंत्री होऊ शकतात.

मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर सोमवारी मुंबईतील राजभवनात शपथविधी सोहळा होऊ शकतो. सीएम शिंदे यांनी विजयानंतर सांगितले होते की, ज्याच्या जास्त जागा असतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होणार हे निवडणुकीपूर्वी ठरले नव्हते.

या निवडणुकीत सहा मोठ्या पक्षांच्या दोन आघाड्यांमध्ये लढत होती. महायुतीमध्ये भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांचा समावेश आहे, तर महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) यांचा समावेश आहे.

१४९ जागांवर निवडणूक लढवणाऱ्या भाजपने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या आहेत. युतीने २८८ पैकी विक्रमी २३० जागा जिंकल्या. भाजपचा स्ट्राइक रेट ८८% होता. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीला ४६ जागा मिळाल्या.

## शिवसेना कार्यकारणी बैठकीत एकनाथ शिंदे यांना सर्वाधिकार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :



विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवल्यानंतर शिवसेनेच्या कार्यकारिणीची बैठक आज मुख्यमंत्री आणि पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत मित्र पक्षासोबत चर्चा करण्याचे सर्वाधिकार एकनाथ शिंदे यांना देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

शिवसेनेच्या आमदारांसोबत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे पार पडलेल्या बैठकीत खासदार नरेश म्हस्के यांनी मित्र पक्षासोबत चर्चा करण्याचे सर्वाधिकार एकनाथ शिंदे यांना देण्याचा प्रस्ताव मांडला. तर सिद्धेश कदम यांनी शिवसेना विधिमंडळ पक्षाचे गट नेते, मुख्य प्रतोद, प्रतोद आणि इतर नेत्यांची निवड करण्याचे सर्वाधिकार मुख्य नेते एकनाथ शिंदे यांना देण्याचा प्रस्ताव मांडला.

या बैठकीला ऑनलाइन उपस्थित असलेले आमदार आणि कार्यकरिणीतील इतर सर्व सदस्यांनी या दोन्ही प्रस्तावांना अनुमोदन देऊन याबाबतचे सर्वाधिकार एकनाथ शिंदे यांना देण्याचा निर्णय एकमताने घेतला.

## उबाठाच्या नवनिर्वाचित आमदारांची आज मातोश्री येथे बैठक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

राज्यात सत्तेवर आलेल्या महायुती सरकारचा उद्या शपथविधी सोहळा होणार असताना, दुसरीकडे शिवसेनेनेही (ठाकरे) आपल्या नवनिर्वाचित आमदारांची सोमवारी सकाळी ११: ३० वाजता बैठक बोलावली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे या बैठकीला मार्गदर्शन करणार असून आमदारांचा गटनेताही निवडला जाणार आहे.

विधानसभा निवडणूक निकालात महायुतीने महाविकास आघाडीचा पुरता सुफडा साफ करुन सत्ता काबीज केली. शिवसेनेने (ठाकरे) यात २० जागा जिंकल्या. निकालानंतर शिवसेनेने (ठाकरे) तातडीने आपल्या नवनिर्वाचित आमदारांची सकाळी ११.३० च्या सुमारास बैठक बोलावली आहे.

## ऋषभ-श्रेयस आयपीएल इतिहासातील सर्वात महागडे खेळाडू

■ वृत्तसंस्था
जेद्दाह, दि. २४ :

सौदी अरेबियातील जेद्दाह येथे सुरू असलेल्या मेगा लिलावात 2 भारतीय क्रिकेटपटू आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठे खेळाडू ठरले आहेत.

पहिल्या क्रमांकावर ऋषभ पंत आहे, जो आतापर्यंतचा सर्वात महागडा क्रिकेटर आहे. दिल्ली कॅपिटल्सचा माजी कर्णधार आणि यष्टीरक्षक पंतला लखनौ सुपर जायंट्सने 27 कोटींना विकत घेतले.

दुसऱ्या क्रमांकावर कर्णधार आणि फलंदाज श्रेयस अय्यर आहे, ज्याने गेल्या मोसमात कोलकात्याला चॅम्पियन बनवले होते. श्रेयसला पंजाब किंग्जने 26.75 कोटींची बोली लावून विकत घेतले.

आश्चर्यकारक डील व्यंकटेश अय्यरची होता, ज्यासाठी कोलकाता नाईट रायडर्स आणि बंगळुरू रॉयल चॅलेंजर्स यांच्यात 23.50 कोटी रुपयांपर्यंतच्या बोली लागल्या होत्या. कोलकाताने व्यंकटेशला 23.75 कोटींना विकत घेतले. वेंकटेशनने गेल्या आयपीएल फायनलमध्ये हैदराबादविरुद्ध अर्धशतक झळकावले होते.



मिचेल स्टार्कला दिल्लीने 11.75 कोटींना विकत घेतले. गेल्या मोसमात त्याला कोलकाताने 24.75 कोटी रुपयांना विकत घेतले होते. यावेळी किंमत जवळपास निम्म्यावर आली होती.

ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर डेव्हिड वॉर्नर आणि इंग्लंडचा आघाडीचा फलंदाज जॉनी बेअरस्टो यांची विक्री झाली नाही.

## हेमंत सोरेन २८ नोव्हेंबरला मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार

■ वृत्तसंस्था
रांची, दि. २४ :



झारखंडमध्ये पुन्हा इंडिया ब्लॉकचे सरकार स्थापन होणार आहे. रविवारी इंडिया आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांची मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बैठक झाली. यामध्ये हेमंत सोरेन यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली.

यानंतर त्यांनी राजभवनात जाऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि नवे सरकार स्थापन करण्याचा दावा केला. राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच सरकारची पुनरावृत्ती होत आहे. आतापर्यंत प्रत्येक निवडणुकीत सरकार बदलत असे.

राजभवनाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना हेमंत सोरेन म्हणाले- राज्यपाल संतोष गंगवार यांनी हंगामी मुख्यमंत्र्यांची नियुक्ती केली आहे. २८ नोव्हेंबरला शपथविधी होणार आहे.




## संसदेच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी सर्वपक्षीय बैठक

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :

१८ व्या लोकसभेचे तिसरे अधिवेशन (हिवाळी अधिवेशन) २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. तत्पूर्वी, रविवारी गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक झाली.

यावेळी ३० पक्षांचे एकूण ४२ नेते उपस्थित होते. लोकसभेत पहिल्याच दिवशी काँग्रेससह विरोधकांनी अदानी प्रकरणावर चर्चेची मागणी केली आहे.

यूएस न्यूयॉर्क फेडरल कोटार्ने गौतम अदानी यांच्यावर सौरऊर्जेचे कंत्राट मिळवण्यासाठी भारतीय अधिकाऱ्यांना सुमारे २२०० कोटी रुपयांची लाच दिल्याचा आरोप केला आहे. राहुल गांधी यांनी याप्रकरणी जेपीसीची मागणी केली आहे.

काँग्रेस नेते प्रमोद तिवारी म्हणाले की, त्यांच्या पक्षाने मणिपूरचा मुद्दा, प्रदूषण आणि रेल्वे अपघातांवर संसदेत चर्चा करण्याचाही प्रस्ताव दिला आहे. तथापि, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, विरोधकांनी सभागृहाचे कामकाज सुरळीत चालू द्यावे.




## युपीत हिंसाचार तिघांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, संभल, दि. २४ :

उत्तर प्रदेशातील संभल येथील जामा मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान उसळलेल्या हिंसाचारात तीन तरुणांचा मृत्यू झाला. हिंसाचारात सीओ अनुज चौधरी आणि एसपीचे पीआरओ यांच्या पायाला गोळी लागली होती. एसपीसह अन्य 15 पोलिस जखमी झाले आहेत.

हिंसाचारानंतर पुढील 24 तास इंटरनेट बंद करण्यात आले आहे. संपूर्ण शहरात अघोषित संचारबंदीचे वातावरण आहे. जामा मशिदीकडे जाणाऱ्या तिन्ही मार्गांवर बॅरिकेडिंग करण्यात आले आहे.

पोलिसांच्या गोळीबारामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा दावा मृतांच्या नातेवाईकांनी केला आहे. मात्र, आयुक्त म्हणाले, 'पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झालेला नाही. तर, हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात तरुणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तीन तरुणांचा मृत्यू झाल्याने शहरात पुन्हा तणावाचे वातावरण आहे.

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ : नवनिर्वाचित आमदार

१ अक्कलकुवा - आमशा पाडवी (एकनाथ शिंदे शिवसेना)
२ शहादा - राजेश पाडवी (भाजप)
३ नंदुरबार - विजयकुमार गावीत (भाजप)
४ नवापूर - कृष्णकुमार नाईक (काँग्रेस)
५ साक्री - मंजुळा गावित (शिवसेना शिंदे)
६ धुळे ग्रामीण - राघवेंद्र पाटील (भाजप)
७ धुळे शहर - अनुप अग्रवाल (भाजप)
८ सिंदखेडा - जयकुमार रावल (भाजपा)
९ शिरपूर - काशिराम पावरा (भाजप)
१० चोपडा - चंद्रकांत सोनावणे (शिवसेना शिंदे)
११ रावेर - अमोल जावळे (भाजप)
१२ भुसावळ - संजय सावकारे (भाजप)
१३ जळगाव शहर - सुरेश भोळे (भाजप)
१४ जळगाव ग्रामीण - गुलाबराव पाटील (शिवसेना शिंदे)
१५ अमळनेर - अनिल पाटील (अजित पवार राष्ट्रवादी)
१६ एरंडोल - अमोल पाटील (शिवसेना शिंदे)
१७ चाळीसगांव - मंगेश चव्हाण (भाजप)
१८ पाचोरा किशोर पाटील (शिवसेना शिंदे)
१९ जामनेर - गिरीश महाजन (भाजपा)
२० मुक्ताईनगर - चंद्रकांत पाटील (शिवसेना शिंदे)
२१ मलकापूर - चैनसुख संचेती (भाजप)
२२ बुलढाणा - संजय गायकवाड (शिवसेना शिंदे)
२३ चिखली - श्वेता महाले (भाजप)
२४ सिंदखेड राजा - मनोज कायंदे (अजित पवार गट)
२५ मेहकर - सिद्धार्थ खरात (शिवसेना ठाकरे)
२६ खामगांव - आकाश फुंडकर (भाजप)
२७ जळगाव (जामोद) - डॉ. संजय कुटे (भाजप)
२८ अकोट - प्रकाश भारसाकळे (भाजप)
२९ बाळापूर - नितीन देशमुख (शिवसेना ठाकरे)
३० अकोला पश्चिम - साजिद खान (काँग्रेस)
३१ अकोला पूर्व - रणधीर सावरकर (भाजप)
३२ मुर्तिजापूर - हरीश पिंपळे (भाजप)
३३ रिसोड - अमित झनक (काँग्रेस)
३४ वाशिम - श्याम रामचरणजी खाडे (भाजप)
३५ कारंजा - सई डहाके (भाजप)
३६ धामणगाव रेल्वे - प्रताप अडसड (भाजप)
३७ बडनेरा - रवी राणा (भाजप पुरस्कृत)
३८ अमरावती - सुलभा खोडके (एनसीपी-अजित पवार)
३९ तिवसा - राजेश वानखेडे (भाजप)
४० दर्यापूर - गजाजन लवटे (शिवसेना ठाकरे)
४१ मेळघाट - केवलराम तुलसीराम काळे (भाजप)
४२ अचलपूर - प्रवीण तायडे (भाजप)
४३ वरूड-मोर्शी - उमेश यावलकर (भाजप)
४४ आर्वी - सुमित वानखेडे (भाजप)
४५ देवळी - राजेश बकाने (भाजप)
४६ हिंगणघाट - समीर कुणावार (भाजप)
४७ वर्धा - डॉ. पंकज भोयर (भाजप)
४८ काटोल - चरणसिंह ठाकूर (भाजप)
४९ सावनेर - आशिष देशमुख (भाजप)
५० हिंगणा - समीर मेघे (भाजप)
५१ उमरेड - संजय मेश्राम (काँग्रेस)
५२ नागपूर दक्षिण पश्चिम - देवेंद्र फडणवीस (भाजप)
५३ नागपूर दक्षिण - मोहन मते (भाजप)
५४ नागपूर उत्तर - डॉ. नितीन राऊत (काँग्रेस)
५५ कामठी - चंद्रशेखर बावनकुळे (भाजप)
५६ रामटेक - आशिष जैस्वाल (शिवसेना शिंदे)
५७ तुमसर - राजू कोरमोरे (एनसीपी-अजित पवार)
५८ भंडारा - नरेंद्र भोंडेकर (शिवसेना शिंदे)
५९ साकोली - नानाभाऊ पटोले (काँग्रेस)
६० अर्जुनी मोरगाव - राजकुमार बडोले (एनसीपी-अजित पवार)
६१ तिरोडा - विजय रहांगडाले (भाजप)
६२ गोंदिया - विनोद अग्रवाल (भाजप)
६३ आमगाव - संजय पुरम (भाजप)
६४ आरमोरी - रामदास मसराम (काँग्रेस)
६५ गडचिरोली - डॉ. मिलिंद नरोटे (भाजप)
६६ अहेरी - धर्मरावबाबा आत्राम (एनसीपी-अजित पवार)
६७ राजुरा - देवराव भोंगळे (भाजप)
६८ चंद्रपूर - किशोर जोरगेवार (भाजप)
६९ बल्लारपूर - सुधीर मुनगंटीवार (भाजप)
७० ब्रह्मपुरी - विजय वडेट्टीवार (काँग्रेस)
७१ चिमूर - बंटी भांगडिया (भाजप)
७२ वरोरा - करण संजय देवतळे (भाजप)
७३ वणी - संजय देरकर (शिवसेना ठाकरे)
७४ राळेगाव - अशोक उइके (भाजप)
७५ यवतमाळ - अनिल मंगुळकर (काँग्रेस)
७६ दिग्रस - संजय राठोड (शिवसेना शिंदे)
७७ आर्णी - राजू तोडसाम (भाजप)
७८ पुसद - इंद्रनील नाईक (एनसीपी-अजित पवार)
७९ उमरखेड - कशिन वानखेडे (भाजप)
८० किनवट - भीमराव केराम (भाजप)
८१ हदगाव - बाबुराव कोहळीकर (शिवसेना शिंदे)
८२ भोकर - श्रीजया चव्हाण (भाजप)
८३ नांदेड - बालाजी कल्याणकर (शिवसेना शिंदे)
८४ नांदेड दक्षिण - आनंद तिडके पाटील (शिवसेना शिंदे)
८५ लोहा- प्रताप पाटील चिखलीकर (एनसीपी-अजित पवार)
८६ नायगाव - राजेश पवार (भाजप)
८७ देगलूर - जितेश अंतापूरकर (भाजप)
८८ मुखेड - तुषार राठोड (भाजप)
८९ बसमत - चंद्रकांत नवघरे (एनसीपी-अजित पवार)
९० कळमनुरी - संतोष बांगर (शिवसेना शिंदे)
९१ हिंगोली - तानाजी मुटकुळे (भाजप)
९२ जिंतूर - मेघना बोर्डीकर (भाजप)
९३ परभणी - आनंद भरोसे (शिवसेना शिंदे)
९४ गंगाखेड - रत्नाकर गुट्टे (भाजप पुरस्कृत)
९५ पाथरी - राजेश विटेकर (एनसीपी-अजित पवार)
९६ परतूर - बबनराव लोणीकर (भाजप)
९७ घनसावंगी - हिकमत उढाण (शिवसेना- शिंदे)
९८ जालना - अर्जुन खोतकर (शिवसेना शिंदे)
९९ बदनापूर - नारायण कुचे (भाजप)
१०० भोकरदन - संतोष दानवे (भाजप)
१०१ सिल्लोड - अब्दुल सत्तार (शिवसेना शिंदे)
१०२ कन्नड - संजना जाधव (शिवसेना -शिंदे)
१०३ फुलंब्री - अनुराधा चव्हाण (भाजप)
१०४ औरंगाबाद (मध्य) - प्रदीप जैस्वाल (शिवसेना शिंदे)
१०५ औरंगाबाद (पश्चिम) - संजय शिरसाट (शिवसेना शिंदे)
१०६ औरंगाबाद (पूर्व) - अतुल सावे (भाजप)
१०७ पैठण - विलास संदीपान भुमरे (शिवसेना शिंदे)
१०८ गंगापूर - प्रशांत बंब (भाजप)
१०९ वैजापूर - रमेश बोरनारे (शिवसेना शिंदे)
११० मालेगाव (मध्य) - मुफ्ती इस्माईल (एमआयएम)
१११ मालेगाव (बाह्य) - दादा भुसे (शिवसेना शिंदे)
११२ बागलाण - दिलीप बोरसे (भाजप)

| | | |
|---|---|---|
| ११३ | कळवण | नितीन पवार (एनसीपी-अजित पवार) |
| ११४ | चांदवड | डॉ. राहुल अहेर (भाजप) |
| ११५ | येवला | छगन भुजबळ (एनसीपी-अजित पवार) |
| ११६ | सिन्नर | माणिकराव कोकाटे (एनसीपी-अजित पवार) |
| ११७ | निफाड | दिलीप बनकर (एनसीपी अजित पवार) |
| ११८ | दिंडोरी | नरहरी झिरवळ (एनसीपी अजित पवार) |
| ११९ | नाशिक पू. | राहुल ढिकाले (भाजप) |
| १२० | नाशिक मध्य | देवयानी सुहास फरांदे (भाजप) |
| १२१ | नाशिक पश्चिम | सीमा हिरे (भाजप) |
| १२२ | देवळाली | सरोज आहिरे (एनसीपी-अजित पवार) |
| १२३ | इगतपूरी | भिका खोसकर (राष्ट्रवादी-अजित पवार) |
| १२४ | डहाणू | विनोद निकोले (माकप) |
| १२५ | विक्रमगड | हरिश्चंद्र सखाराम भोये (भाजप) |
| १२६ | पालघर | राजेंद्र गावित (शिवसेना शिंदे) |
| १२७ | बोईसर | विलास तरे (शिवसेना शिंदे) |
| १२८ | नालासोपारा | राजन नाईक (भाजप) |
| १२९ | वसई | स्नेहा दुबे (भाजप) |
| १३० | भिवंडी ग्रा. | शांताराम मोरे (शिवसेना शिंदे) |
| १३१ | शहापूर | दौलत दरोडा (एनसीपी-अजित पवार) |
| १३२ | भिवंडी प. | महेश चौघुले (भाजप) |
| १३३ | भिवंडी पू. | रईस शेख (समाजवादी पक्ष) |
| १३४ | कल्याण प. | विश्वनाथ भोईर (शिवसेना शिंदे) |
| १३५ | मुरबाड | किसन कथोरे (भाजप) |
| १३६ | अंबरनाथ | डॉ. बालाजी किणीकर (शिवसेना शिंदे) |
| १३७ | उल्हासनगर | कुमार आयलानी (भाजप) |
| १३८ | कल्याण पूर्व | सुलभा गायकवाड (भाजप) |
| १३९ | डोंबिवली | रवींद्र चव्हाण (भाजप) |
| १४० | कल्याण ग्रा. | राजेश मोरे (शिवसेना शिंदे) |
| १४१ | मीरा भाईंदर | नरेंद्र मेहता (भाजप) |
| १४२ | ओवळा माजिवडा | प्रताप सरनाईक (शिवसेना शिंदे ) |
| १४३ | कोपरी पाचपाखडी | एकनाथ शिंदे (शिवसेना शिंदे गट) |
| १४४ | ठाणे शहर | संजय केळकर (भाजप) |
| १४५ | मुंब्रा - कळवा | जितेंद्र आव्हाड (एनसीपी शरद पवार गट) |
| १४६ | ऐरोली | गणेश नाईक (भाजप) |
| १४७ | बेलापूर | मंदा म्हात्रे (भाजप) |
| १४८ | बोरिवली | संजय उपाध्याय (भाजप) |
| १४९ | दहिसर | मनिषा चौधरी (भाजप) |
| १५० | मागाठाणे | प्रकाश सुर्वे (शिवसेन शिंदे गट) |
| १५१ | मुलुंड | मिहिर कोटेचा (भाजप) |
| १५२ | विक्रोळी | सुनील राऊत (शिवसेना ठाकरे) |
| १५३ | भांडूप पश्चिम | अशोक पाटील (शिवसेना शिंदे) |
| १५४ | जोगेश्वरी पूर्व | अनंत नर (शिवसेना ठाकर ) |
| १५५ | दिंडोशी | सुनील प्रभू (शिवसेना ठाकरे) |
| १५६ | कांदिवली पूर्व | अतुल भातखळकर (भाजप) |
| १५७ | चारकोप | योगेश सागर (भाजप) |
| १५८ | मालाड पश्चिम | अस्लम आर. शेख (काँग्रेस) |
| १५९ | गोरेगाव | विद्या ठाकूर (भाजप) |
| १६० | वर्सोवा | हरुन खान (शिवसेना ठाकरे) |
| १६१ | अंधेरी पश्चिम | अमित साटम (भाजप) |
| १६२ | अंधेरी पूर्व | मुरजी पटेल (शिवसेना शिंदे गट) |
| १६३ | विलेपार्ले | पराग अळवणी (भाजप) |
| १६४ | चांदिवली | दिलीप लांडे (शिवसेना शिंदे) |
| १६५ | घाटकोपर पश्चिम | राम कदम (भाजप) |
| १६६ | घाटकोपर पूर्व | पराग शाह (भाजप) |
| १६७ | मानखूर्द शिवाजीनगर | अबू आझमी (समाजवादी पक्ष) |
| १६८ | अणुशक्ती नगर | सना मलिक (अजित पवार गट) |
| १६९ | चेंबूर | तुकाराम काते (शिवसेना शिंदे) |
| १७० | कुर्ला | मंगेश कुडाळकर (शिवसेना शिंदे) |
| १७१ | कलिना | संजय पोतनीस (शिवसेना ठाकरे) |
| १७२ | वांद्रे पूर्व | वरुण सरदेसाई (शिवसेना ठाकरे) |
| १७३ | वांद्रे पश्चिम | आशिष शेलार (भाजप) |
| १७४ | धारावी | डॉ. ज्योती गायकवाड (काँग्रेस) |
| १७५ | सायन कोळीवाडा | आर. तमिल सेल्वन (भाजप) |
| १७६ | वडाळा | कालिदास कोळंबकर (भाजप) |
| १७७ | माहीम | महेश सावंत (शिवसेना ठाकरे) |
| १७८ | वरळी | आदित्य ठाकरे (शिवसेना ठाकरे गट) |
| १७९ | शिवडी | अजय चौधरी (शिवसेना ठाकरे ) |
| १८० | भायखळा | मनोज जामसुतकर (शिवसेना ठाकरे ) |
| १८१ | मलबाहर हिल | मंगलप्रभात लोढा (भाजप) |
| १८२ | मुंबादेवी | अमिन पटेल (काँग्रेस) |
| १८३ | कुलाबा | ॲड. राहुल नार्वेकर (भाजप) |
| १८४ | पनवेल | प्रशांत ठाकूर (भाजप) |
| १८५ | कर्जत | महेंद्र थोरवे (शिवसेना शिंदे) |
| १८६ | उरण | महेश बाल्दी (भाजप) |
| १८७ | पेण | रवींद्र दगडू पाटील (भाजप) |
| १८८ | अलिबाग | महेंद्र दळवी (शिवसेना शिंदे) |
| १८९ | श्रीवर्धन | आदिती तटकरे (अजित पवार गट) |
| १९० | महाड | भरत गोगावले (शिवसेना शिंदे) |
| १९१ | चिपळूण | शेखर निकम (अजित पवार गट) |
| १९२ | जुन्नर | शरद सोनावणे (अपक्ष) |
| १९३ | आंबेगाव | दिलीप वळसे पाटील (अजित पवार गट) |
| १९४ | खेड आळंदी | बाबाजी काळे (शिवसेना ठाकरे) |
| १९५ | शिरूर | ज्ञानेश्वर कटके (अजित पवार गट) |
| १९६ | दौंड | ॲड. राहुल कुल (भाजप) |
| १९७ | इंदापूर | दत्तात्रय भरणे (अजित पवार गट) |
| १९८ | बारामती | अजित पवार (अजित पवार गट) |
| १९९ | पुरंदर | विजय शिवतारे (शिवसेना शिंदे गट) |
| २०० | भोर | शंकर मांडेकर (अजित पवार गट) |
| २०१ | मावळ | सुनील शेळके (अजित पवार गट) |
| २०२ | चिंचवड | शंकर जगताप (भाजप) |
| २०३ | पिंपरी | आण्णा बनसोडे (अजित पवार गट) |
| २०४ | भोसरी | महेश लांडगे (भाजप) |
| २०५ | वडगाव शेरी | बापु साहेब पठारे (शरद पवार गट) |
| २०६ | शिवाजीनगर | सिद्धार्थ शिरोळे (भाजप) |
| २०७ | कोथरूड | चंद्रकांत पाटील (भाजप) |
| २०८ | खडकवासला | भीमराव तापकीर (भाजप) |
| २०९ | पर्वती | माधुरी मिसाळ (भाजप) |
| २१० | हडपसर | चेतन तुपे (अजित पवार गट) |
| २११ | पुणे कॅन्टोन्मेंट | सुनील कांबळे (भाजप) |
| २१२ | कसबा पेठ | हेमंत नारायण रासने (भाजप) |
| २१३ | अकोले | किरण लहामटे (अजित पवार गट) |
| २१४ | संगमनेर | अमोल खताळ (शिवसेना शिंदे) |
| २१५ | शिर्डी | राधाकृष्ण विखे पाटील (भाजप) |
| २१६ | कोपरगाव | आशुतोष काळे (अजित पवार गट) |
| २१७ | श्रीरामपूर | हेमंग उगले (काँग्रेस) |
| २१८ | नेवासा | विठ्ठलराव लंघे पाटील (शिवसेना शिंदे) |
| २१९ | शेवगाव | मोनिका राजळे (भाजप) |
| २२० | राहुरी | शिवाजीराव कर्डिले (भाजप) |
| २२१ | पारनेर | काशिनाथ दाते (अजित पवार गट) |
| २२२ | अहमदनगर शहर | संग्राम जगताप (अजित पवार गट) |
| २२३ | श्रीगोंदा | विक्रम पाचपुते (भाजप) |
| २२४ | कर्जत जामखेड | रोहित पवार (शरद पवार गट) |

| | | |
|---|---|---|
| २२५ | नांदगाव | सुहास कांदे (शिवसेना शिंदे गट) |
| २२६ | माजलगाव | प्रकाश सोळंके (राष्ट्रवादी काँग्रेस) |
| २२७ | बीड | संदीप क्षीरसागर (शरद पवार गट) |
| २२८ | आष्टी | सुरेश धस (भाजप) |
| २२९ | केज | नमिता मुंदडा (भाजप) |
| २३० | परळी | धनंजय मुंडे (अजित पवार गट) |
| २३१ | लातूर ग्रा. | रमेश कराड (भाजप) |
| २३२ | लातूर शहर | अमित देशमुख (काँग्रेस) |
| २३३ | अहमदपूर | बाबासाहेब पाटील (अजित पवार गट) |
| २३४ | उदगीर | संजय बनसोडे (अजित पवार गट) |
| २३५ | निलंगा | संभाजी पाटील निलंगेकर (भाजप) |
| २३६ | औसा | अभिमन्यू पवार (भाजप) |
| २३७ | उमरगा | प्रवीण स्वामी (शिवसेना ठाकरे) |
| २३८ | तुळजापूर | राणा जगजीतसिंह पाटील (भाजप) |
| २३९ | उस्मानाबाद | कैलास पाटील (शिवसेना ठाकरे) |
| २४० | परांडा | तानाजी सावंत (शिवसेना शिंदे) |
| २४१ | करमाळा | नारायण पाटील (शरद पवार गट) |
| २४२ | माढा | अभिजित पाटील (शरद पवार गट) |
| २४३ | बार्शी | दिलीप सोपल (शिवसेना ठाकरे) |
| २४४ | मोहोळ | राजू खरे (शरद पवार गट) |
| २४५ | सोलापूर उत्तर | विजयकुमार देशमुख (भाजप) |
| २४६ | सोलापूर मध्य | देवेंद्र राजेश कोठे (भाजप) |
| २४७ | अक्कलकोट | सचिन कल्याणशेट्टी (भाजप) |
| २४८ | सोलापूर दक्षिण | सुभाष देशमुख (भाजप) |
| २४९ | पंढरपूर | समाधान महादेव अवताडे (भाजप) |
| २५० | सांगोला | बाबासाहेब देशमुख (शेकाप) |
| २५१ | माळशिरस | उत्तमराव जानकर (शरद पवार गट) |
| २५२ | फलटण | सचिन पाटील (अजित पवार गट) |
| २५३ | वाई | मकरंद पाटील (अजित पवार गट) |
| २५४ | कोरेगाव | महेश शिंदे (शिवसेना शिंदे) |
| २५५ | माण | जयकुमार गोरे (भाजप) |
| २५६ | कराड उत्तर | मनोज घोरपडे (भाजप) |
| २५७ | कराड दक्षिण | अतुल भोसले (भाजप) |
| २५८ | पाटण | शंभूराज देसाई (शिवसेना शिंदे) |
| २५९ | सातारा | शिवेंद्रराजे भोसले (भाजप) |
| २६० | दापोली | योगेश कदम (शिवसेना शिंदे) |
| २६१ | गुहागर | भास्कर जाधव (शिवसेना ठाकरे) |
| २६२ | रत्नागिरी | उदय सामंत (शिवसेना शिंदे) |
| २६३ | राजापूर | किरण सामंत (शिवसेना शिंदे) |
| २६४ | कणकवली | नितेश राणे (भाजप) |
| २६५ | कुडाळ | निलेश राणे (शिवसेना शिंदे) |
| २६६ | सावंतवाडी | दीपक केसरकर (शिवसेना शिंदे) |
| २६७ | चंदगड | शिवाजी पाटील (अपक्ष) |
| २६८ | राधानगरी | प्रकाश आबिटकर (शिवसेना शिंदे) |
| २६९ | कागल | हसन मुश्रीफ (अजित पवार गट) |
| २७० | कोल्हापूर द. | अमल महाडिक (भाजप) |
| २७१ | करवीर | चंद्रदीप नरके (शिवसेना शिंदे) |
| २७२ | कोल्हापूर उत्तर | राजेश क्षीरसागर (शिवसेना शिंदे) |
| २७३ | शाहूवाडी | विनय कोरे (भाजप पुरस्कृत) |
| २७४ | हातकणंगले | अशोक माने (शिंदे गट पुरस्कृत) |
| २७५ | इचलकरंजी | राहुल आवाडे (भाजप) |
| २७६ | शिरोळ | राजेंद्र पाटील यड्रावकर (शिंदे गट पुरस्कृत) |
| २७८ | मिरज | सुरेश खाडे (भाजप) |
| २७९ | सांगली | सुधीर गाडगीळ (भाजप) |
| २८० | इस्लामपूर | निशिकांत पाटील (अजित पवार गट) |
| २८१ | शिराळा | सत्यजित देशमुख (भाजप) |
| २८२ | पलुस कडेगांव | डॉ. विश्वजीत कदम (काँग्रेस) |
| २८३ | खानापूर | सुहास बाबर (शिवसेना शिंदे) |
| २८४ | तासगावं कवठे | रोहित पाटील (शरद पवार गट) |
| २८५ | जत | गोपीचंद पडळकर (भाजप) |
| २८६ | नागपूर पूर्व | कृष्णा खोपडे (भाजप) |
| २८७ | नागपूर (पश्चिम) | विकास ठाकरे (काँग्रेस) |
| २८८ | नागपूर (मध्य) | प्रवीण दटके (भाजप) |

## ठाकरे बंधूंनी एकत्र यावे..

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र यावे, यासाठी आम्ही स्वतःहून साद यापूर्वी घातली होती. आता जर त्यांनी साद घातली तर राज ठाकरे निर्णय घेतील. असे विधान मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी केले आहे. तसेच माहीममध्ये भाजपने मनसेला एकटे पाडले असा आरोप सुद्धा महाजन यांनी केला आहे.

विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाला तसेच राज ठाकरे यांच्या मनसेला चांगलाच दणका बसला आहे. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र यावे, अशी चर्चा सुरू झाली आहे. यावर महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

प्रकाश महाजन म्हणाले, जेव्हा स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो, जी मंडळी दुसऱ्यांच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण करत होती, त्यांचे अस्तित्व पणाला लागले तेव्हा आमची गरज त्यांना वाटते. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र यावे, यासाठी आम्ही स्वतःहून साद यापूर्वी घातली होती. आता जर त्यांनी साद घातली तर राज ठाकरे निर्णय घेतील, समोरच्याची इच्छा काय आहे हे पाहिले जाईल. राज ठाकरे तर कधीही मैत्रीचा हात समोर करतात. पण आमचा पूर्वानुभव वेगळा आहे. आम्ही सगळ्या गोष्टीला तोंड देऊ. पराभव आम्हाला नवीन नाही. त्यातून आम्ही उभारी घेऊ, असे महाजन म्हणाले.

## महायुतीतील ६ नेत्यांना विधान परिषदेची लॉटरी

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचा निकाल अखेर जाहीर झाला आहे. यात महायुतीला स्पष्टपणे बहुमत मिळाले आहे. तर महाविकासआघाडीचा दारुण पराभव झाला.

महायुतीने 230 जागांवर विजय मिळवला. यात भाजप 132 जागा, शिवसेना शिंदे गट 57 आणि राष्ट्रवादी अजित पवार गट 41 जागांवर आघाडीवर आहेत. तर महाविकासआघाडीला फक्त 46 जागांवर समाधान मानावे लागले आहे.

यात काँग्रेस 16 जागा, ठाकरे गट 20 जागा आणि राष्ट्रवादी शरद पवार गट 10 जागा मिळाल्या आहेत. तर अपक्ष-इतर यांना 12 जागा मिळाल्या आहेत. यामुळे राज्यात महायुतीची सत्ता येणार हे निश्चित झाले आहे. यानंतर आता सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. तर दुसरीकडे विधानसभेत डावललेल्या नाराजांना आता महायुती विधान परिषदेवर संधी देणार आहे.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने अनेक दिग्गजांना मैदानात उतरवले होते. यात विधानपरिषदेवर आमदार असलेल्या काही नेत्यांच्या नावांचाही समावेश होता. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विधानपरिषदेवर असलेल्या आमदारांचा विजय झाला आहे. त्यामुळे विधानपरिषदेच्या ६ जागा रिक्त झाल्या आहेत. आता या रिक्त जागांवर नाराज असलेल्यांना संधी दिली जाणार आहे.

**भाजपच्या ४ जागा रिक्त**

विधानसभेच्या निकालानंतर विधानपरिषदेच्या एकूण सहा जागा रिक्त झाल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत विधानपरिषदेतील भाजपच्या ४ आमदारांची विधानसभेवर वर्णी लागली. सध्या चंद्रशेखर बावनकुळे, गोपीचंद पडळकर, रमेश कराड आणि प्रविण दटके हे विधानपरिषदेचे आमदार आहेत. हे चार नेते विधानसभेवर निवडून गेले आहेत. त्यामुळे विधानपरिषदेत भाजपच्या ४ जागा रिक्त झाल्या आहेत.

**कोणाला संधी देणार?**

तर दुसरीकडे शिवसेनेकडून आमश्या पाडवी यांचीही विधानसभेवर निवड झाली आहे. त्यामुळे शिवसेनेची एक जागा विधानपरिषदेत रिक्त झाली आहे. विधानसभा निवडणुकीत तिकीट न मिळालेल्या एका नाराजाला शांत करण्याची एकनाथ शिंदे यांना संधी आहे. तसेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते राजेश विटेकर हे देखील विधानपरिषदेवर आमदार आहेत.

पण नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ते विजयी झाले आहेत. त्यामुळे त्यांची विधानपरिषदेची जागा रिक्त झाली आहे. यानुसार महायुतीच्या विधानपरिषदेच्या एकूण ६ जागा रिक्त झाल्या आहेत. यामुळे आता महायुतीचे तिन्ही घटकपक्ष नेमकं कोणाला संधी देणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## लाडकी बहीण योजनेमुळे आम्ही निवडून आलो...

### छगन भुजबळ यांची प्रांजळ कबुली



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
जनतेने आम्हाला कौल दिला आहे. कायद्याच्या दृष्टीने जो प्रश्न होता तो सुटला. तसंच कुठल्याही गोंधळाची परिस्थिती आता राहिलेली नाही. लोकसभा निवडणुकीनंतर जे नैराश्य आलं होतं ते दूर करण्यात देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे हे सगळे यशस्वी ठरले आहेत, लाडकी बहीण योजना सुरु केल्यानंतर वेळेवर सगळ्यांना पैसे मिळाले. अजित पवारांच्या अर्थखात्याने ती जबाबदारी घेतली होती. जे सरकार बोलतं आहे ते करतं आहे याची खात्री लाडक्या बहिणींनाही पटली, तसंच त्यांच्या घरातही ही गोष्ट पटली त्यामुळे आम्हाला चांगलं मतदान झालं असंही छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

या तिघांनी सगळ्या सहका?यांसह प्रचंड मेहनत घेतली. अजित पवार सकाळी ६ वाजल्यापासून काम करत होते. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांनीही अशीच मेहनत घेतली. तसंच लोकसभेच्या अपयशानंतर जो संभ्रम निर्माण झाला होता तो दूर करण्याचं काम या तिघांनीही केलं. आमच्या यशात लाडक्या बहिणींचा वाटा खूप मोठा आहे असंही छगन भुजबळ म्हणाले.

महिलांचं मतदानही इतर निवडणुकांपेक्षा जास्त झालं आहे. महिला जेव्हा मतदान करतात त्या घरांमधले पुरुषही एकत्रित निर्णय घेऊन मतदान घेतात. शरद पवारांनी माज्या मतदारसंघात पाडा असं म्हटलं होतं. अभ्यास करुन निर्णय घेतला होता. पण मनोज जरांगेंचं काय काय काम होतं? प्रचार संपायच्या आदल्या दिवशी हाताला सलाईन लावून माझ्याकडे पाहा, माझं काहीही होऊ शकतं आपल्या लेकरबाळांसाठी लढतोय. यांना (छगन भुजबळ) पाडा असं सगळं सांगितलं. माझ्या मतदारसंघात त्याचा परिणाम झाला. मात्र हिंदू, मुस्लिम, दलित सगळे एकवटले आणि मतदान व्यवस्थित केलं आणि मी जिंकलो असंही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

## आमदार होताच संजय गायकवाडांचे टीकास्त्र

### संजय राऊतांना वेड लागल्याची बोचरी टीका





**■ महासागर प्रतिनिधी**
**बुलढाणा, दि. २४ :**
बुलढाणा विधानसभा मतदारसंघातून विजयी झालेले शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी ठाकरे गटाचे संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. संजय राऊत यांना आम्ही गांभीर्याने घेत नाही. त्यांना आता मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल केले पाहिजे, अशा शब्दांत गायकवाड यांनी बोचरी टीका केली आहे.

संजय राऊत यांनी इव्हीएमवर शंका घेत महायुतीच्या विजायवर प्रश्न उपस्थित करत टीका केली होती. यावर संजय गायकवाड यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

संजय गायकवाड म्हणाले, इव्हीएममधून आदित्य ठाकरे हे देखील विजयी झाले आहेत. मग आता त्यावरही आक्षेप घेणार का? ठाकरे गटाचे लोकही निवडून आले आहेत ना? त्यांचा हा रडीचा डाव आहे. महायुतीला मिळालेला विजय हा कामाचा परिणाम आहे. लाडक्या बहिणीचा परिणाम आहे. तसेच महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना धूळ चारली आहे, अशी टीका गायकवाड यांनी केली.

संजय राऊत यांनी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण हे गुजराती लॉबी ठरवेल, तसेच सरकारचा शपथविधी हा गुजरातमधील स्टेडियममध्ये घ्यावा, असा खोचक सल्ला राऊत यांनी दिला होता. यावर संजय गायकवाड म्हणाले, त्या संजय राऊत यांचे कोणतेही विधान आम्ही गांभीर्याने घेत नाही. ते वेडे आहेत. त्यांची आता मेंटल हॉस्पिटलमध्ये जाण्याची वेळ आलेली आहे. तसेच आता ते आयुष्यात कधीही खासदार होणार नाहीत, असेही संजय गायकवाड म्हणाले.

महाराष्ट्रात त्यांनी शपथ घेण्यापेक्षा गुजरातमध्ये शपथविधी सोहळा घेतला तर त्यांच्या लोकांना आनंद होईल. शिवतीर्थावर शपथविधी घेतला तर छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान होईल. वानखेडे स्टेडियमवर घेतला तर 106 हुतात्म्यांचा अपमान होईल. त्यामुळे त्यांनी शपथविधीसाठी गुजरातची निवड करावी, असे संजय राऊत म्हणाले होते.

# प्रोड्युसर कंपनीसाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा: नितीन गडकरी



■ युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
नवनवीन तंत्रज्ञानामुळे शेती करणे अधिक सुलभ होत आहे. अश्यात शेतकऱ्यांनी फार्मर प्रोड्युसर कंपनीसाठी पुढाकार घेतल्यास त्यांना ड्रोन, इलेक्ट्रिक बैलजोडी, यासारखे विविध तंत्रज्ञान भाड्याने घेणे शक्य होईल. त्याचा एकाच वेळेस मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना लाभ होऊन ते नफा वाढवू शकतील असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री आणि ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक नितीन गडकरी यांनी ॲग्रोव्हिजन प्रदर्शनातील फार्मर प्रोड्युसर कंपनी या विषयावर आधारित कार्यशाळेत केले.

या कार्यशाळेला काटोलचे आमदार चरण सिंग ठाकूर,मध्य प्रदेशचे पशुपालन मंत्री लखनजी पटेल, आनंदराव राऊत, मध्य प्रदेशचे फलोत्पादनआणि अन्नप्रक्रिया मंत्री नारायण सिंग कुशवाह, आयोजन सचिव रवींद्र बोरटकर, रमेश मानकर यांची प्रमुख उपस्थिती होती. जवळ जवळ 300 शेतकरी मिळून एक फार्मर प्रोड्युसर कंपनी उभारू शकतात. यामध्ये ते विविध शेतकऱ्यांना पूरक असे तंत्रज्ञान भाड्याने घेऊन त्याचा उपयोग करून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेऊ शकतात. दरम्यान विदभार्तील शेतकऱ्यांनी फार्मर प्रोड्युसर कंपनीसाठी पुढाकार घेतल्यास आणि त्या यशस्वी करून दाखवल्यास पुढच्या वर्षी होणाऱ्या ॲग्रोव्हिजन मध्ये आपण यशस्वी पाच फार्मर प्रोड्युसर कंपन्यांना पुरस्कार देऊ, त्याचप्रमाणे त्यांची यशोगाथा एका छोट्या चित्रपटाच्या माध्यमातून दाखवू असा मानस त्यांनी व्यक्त केला.

अश्या फार्मर प्रोड्युसर कंपनी इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतील असा विश्वास देखील गडकरी यांनी व्यक्त केला. याशिवाय फार्मर प्रोड्युसर कंपनीसाठी सरकारी योजना, बँक आणि इतर सर्व सहाय्य याबद्दल ॲग्रोव्हिजन मध्ये माहिती उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

याशिवाय शेतकऱ्यांनी आपल्या उत्पादनावर प्रक्रिया करून त्याचा अधिक लाभ कसा घेता येईल याकडे देखील लक्ष द्यावं असे ते म्हणाले. अन्नप्रक्रिया उद्योगांकडे आपला माल पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावे असे देखील ते म्हणाले. आपण लवकरच नागपुरात रॅडिसन ब्लु हॉटेल जवळ वर्धा रोडवर शेतकऱ्यांच्या दृष्टीने दालन तयार करत असून त्या ठिकाणी शेतकऱ्यांना आपल्या मालाची विक्री करता येईल आणि नवनवीन तंत्रज्ञान देखील शिकता येईल तसंच माहितीचे आदानप्रदान करता येईल असे गडकरी म्हणाले. यावेळी यशस्वी फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

## ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाचा आज दुपारी २ वाजता समारोप

शेतकरी, उत्पादक, ग्राहक, कृषी विद्यार्थी आणि कृषीप्रेमींनी भरभरून प्रतिसाद दिल्यानंतर चार दिवसांपासून पीडीकेव्ही मैदान, दाभा येथे सुरू असलेल्या भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ॲग्रोव्हिजनचा आज सोमवार, दिनांक 25 नोव्हेंबर रोजी समारोप होत आहे. दुपारी २ वाजता होणाऱ्या या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राहणार असून अरुणाचल प्रदेशचे कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय, दुग्धविकास, मत्स्यपालन, अन्न व नागरी पुरवठा, कायदेशीर मेट्रोलॉजी आणि ग्राहक व्यवहारमंत्री गॅब्रिएल डी. वांगसू यांची समारोपाला प्रमुख उपस्थितीत राहणार आहे. वांगसू यांनी अरुणाचल प्रदेश मध्ये अवलंबलेल्या नवनवीन कृषी पद्धतींची माहिती ते आपल्या मार्गदर्शनपर संबोधनात देणार आहेत. दरम्यान, समारोपीय दिवशी शेतकरी, उत्पादक, ग्राहक, कृषी विद्यार्थी आणि कृषीप्रेमींनी ॲग्रोव्हिजनला भेट द्यावी तसेच, शेतकऱ्यांनी कार्यशाळा व परिषदांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, आयोजन सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर व समिती सदस्यांनी केले आहे.

# भाजपच्या चरण ठाकूरांनी ३० वर्षानंतर काटोलमधील देशमुखी आणली संपुष्टात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
१९९५ पासून काटोल विधानसभा मतदारसंघ आणि अनिल देशमुख असे समीकरणच झाले होते. फक्त २०१४ मध्ये अनिल देशमुख यांचा त्यांचे पुतणे आशिष देशमुख यांनी पराभव केला होता. मात्र मतदारसंघावर राज्य देशमुख यांचेच होते.



यावेळी मात्र देशमुखीला मोठा धक्का बसला आहे. भाजपचे चरणसिंग ठाकूर यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे चिरंजीव सलील देशमुख यांचा पराभव केला आहे. ११ व्या फेरी नंतर चरणसिंग ठाकूर हे ३० हजार मतांच्या आघाडीवर आहे. ही आघाडी आता भरून निघणे अवघड आहे. त्यामुळे कमळाने मतदारसंघात जल्लोष सुरू केला आहे.

अनिल देशमुख १९९५ मध्ये सर्वप्रथम अपक्ष म्हणून निवडून आले होते. युती सरकारमध्ये ते मंत्री झाले. त्यानंतरत ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सहभागी झाले. तेव्हापासून ते सातत्याने मंत्री आहेत. महाविकास आघाडीच्या कार्यकाळत ते गृहमंत्री होते.

ते पुन्हा लढतील आणि निवडून येतील अशीच अपेक्षा सर्वांना होती. मात्र मुलाच्या हट्टामुळे त्यांनी आपला एबी फॉर्म सलील देशमुख यांना दिला. येथेच त्यांचा घात झाल्याचे बोलले जात आहे. चरणसिंग ठाकूर आणि अनिल देशमुख यांच्यात २०१९ मध्ये सामना झाला होता. ही निवडणूक देशमुख यांनी सुमारे १७ हजार मतांनी जिंकली होती.

गृहमंत्री असताना देशमुख यांना तुरुगांत टाकण्यात आले होते. ते १४ महिने तुरुंगात होते. त्यामुळे मतदारसंघात त्यांच्याविषयी सहानुभूती होती. सलील देशमुख यांच्या प्रचारा दरम्यान त्यांच्या गाडीवर दडफेक झाली होती. त्यांच्या डोक्याला जबर दुखापत झाली होती. ही घटनाही सलील देशमुख यांना वाचवू शकली नाही. काटोल-नरखेड विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत भाजपा दुसऱ्यांदा निवडून आली आहे.

## गीतापठणासह होईल गोमातेची सेवा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. २४ :
हिंदू धर्मात मार्गशीर्ष महिन्याला विशेष महत्त्व आहे. पंचांगानुसार हा नववा महिना आहे. मार्गशीर्ष महिन्याला अगाहन महिना म्हणून देखील ओळखले जाते. धार्मिकदृष्ट्या हा महिना खूप महत्त्वाचा आहे. शास्त्रामध्ये हा महिना भगवान श्रीकृष्णाचा विशेष आवडता महिना मानला जातो. हिंदी भाषी लोकांच्या मार्गशिर्ष महिन्याला १६ नोव्हेंबरपासून सुरू झाली असून १५ डिसेंबरपर्यंत साजरा केला जाणार आहे. या अनुषंगाने श्रीकृष्ण मंदिरांमध्ये विविध कार्यक्रमे व धार्मिक अनुष्ठान केले जात आहे.

स्कंद पुराणानुसार या महिन्यात देवाचा आशीर्वाद मिळवण्यासाठी केलेला जप, तप, ध्यान आणि दान यांचे फळ इतर महिन्यांच्या तुलनेत अनेक पटींनी जास्त मिळते. विशेषतः गीता जयंती या महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला साजरी केली जाते जी ११ डिसेंबरला आहे. यादिवशीभगवान श्रीकृष्णाने अर्जुनला गीतेचा उपदेश केला. पं. नरेंद्रनाथ शास्त्री यांच्या मते या महिन्यात श्रीमद भागवत गीतेचे पठण केल्याने केवळ चांगले परिणाम मिळत नाहीत तर आत्मविश्वासही वाढतो. इस्कॉन मंदिरात गीता जयंतीनिमित्त सत्संग, भजनासह अनेक कार्यक्रम होणार आहेत.

## बसपाकडून २६ ला संविधान दिवस साजरा

**नागपूर :** हे वर्ष भारतीय संविधानाचे हिरक महोत्सवी वर्ष असल्याने कही हम भूल ना जाये या अभियानांतर्गत बसपाने 26 नोव्हेंबरला संविधान चौकात सकाळी 11 वाजता सविधान दिवस साजरा करण्याचे ठरविले आहे. आपल्या भारत देशाने 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय संविधान स्वीकारले. त्याला 75 वर्ष होत असून हे हिरक महोत्सवी वर्ष आहे. त्यामुळे नवीन सरकारने हर घर संविधान अंतर्गत भारतीय संविधानाच्या लाखो प्रति छापून त्या प्रत्येक शाळेत, कार्यालयात व गावागावात निशुल्क वितरित कराव्या व 26 नोव्हेंबर ते 26 जानेवारी पर्यंत सतत दोन महिने संविधानावर, त्यातील कर्तव्य व अधिकार यावर चर्चासत्र, मेळावे, सभा, संमेलन घेऊन जनतेला जागृत करावे.

## अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
येथील महात्मा फुले शिक्षण संस्था सभागृहात २८ व २९ डिसेंबरला 'अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या पर्वावर अक्षरक्रांती महाकाव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

नुकताच या काव्यस्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. अक्षरक्रांती फाउंडेशन गेल्या दोन दशकांपासून शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, पर्यावरणीय उपक्रम घेऊन समाजप्रबोधन व समाजहित साधण्यासाठी कार्यरत आहे. डिसेंबर महिन्यात अक्षरक्रांती फाउंडेशन व कला गौरव संस्था, नागपूर यांच्यातर्फे आयोजित अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवात महाकाव्य स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या महाकाव्य स्पर्धेत एकूण १०४ कवी-कवयित्रींनी सहभाग घेतला होता. प्रख्यात कवी, लेखक वसमीक्षक प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांनी अनेक निकषांवर काव्यस्पर्धेचे परीक्षण केले. परीक्षक प्रदत्त यांनी माणिक सोनवणे (छत्रपती संभाजीनगर) यांच्या 'पाऊसपाणी' या कवितेला प्रथम क्रमांक, विद्या निनावे (नागपूर) यांच्या 'वाट पाहतो उंबरा' या कवितेला द्वितीय, तर भावना गंगमवार (वणी, यवतमाळ) यांच्या 'कृष्णमेघ' या कवितेला तृतीय क्रमांक घोषित केले.

एकूण दहा सत्रांत पार पडणाऱ्या दोन दिवसीय अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवाच्या उद्घाटन सत्रात संमेलनाध्यक्ष सुरेश पाचकवडे व देश-विदेशातील मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते तिन्ही विजेत्यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन पुरस्कृत करण्यात येणार आहे.

तसेच या तिन्ही कवी, कवयित्रींना निमंत्रितांचे कवि संमेलनात विजेती कविता सादर करण्याची संधी लाभणार आहे. अक्षरक्रांती फाउंडेशनचे अध्यक्ष शंकर घोरसे व कला गौरव संस्थेच्या अध्यक्ष डॉ. संगीता मानेकर-बनाईत यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

# सुनील केदार पत्नीला विजय मिळवून देण्यात अपयशी
## आशिष देशमुखांनी दिला धक्का

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
जिल्ह्यातील दिग्गज नेते आणि महाविकास आघाडीला एकहाती रामटेक लोकसभा मतदारसंघत जिंकून देणारे, माजी मंत्री सुनील केदारांना सावनेर विधानसभा मतदारसंघात आपल्याच पत्नीला निवडून आणता आले नाही. महाविकास घाडीच्या उमेदवार अनुजा केदार यांना भाजप महायुतीचे आशिष देशमुख यांनी समारे २० हजार मतांच्या फरकांनी पराभवचा धक्का दिला आहे.

२४ डिसेंबर २०२३ ला सुनील छत्रपाल केदार यांना महाराष्ट्र विधानसभेतून अपात्र ठरवण्यात आल्याने सावनेर विधानसभा मतदारसंघ रिक्त झाला. त्यानंतर त्यांनी या मतदारसंघातून पत्नी अनुजा केदार यांना उभे केले होते.

भाजपचे आशिष देशमुख विरोधात उभे होते. २१ व्या फेरी अखेर आशिष देशमुख २२०९९



मतांनी पुढे होते. देशमुख यांना ९४,६५० तर अनुजा केदार यांना ७२,५५१ मते होती. इतका फरक त्या भरून काढणार नाही असे दिसून आले. या पराभवामुळे सुनील केदार यांची दादागिरी संपुष्टात आली आहे.

सावनेर मतदारसंघाची संपूर्ण राज्यात चर्चा होती. २०१४ मध्ये देशमुख काका-पुतण्यांनी निवडणूक गाजवली होती. यावेळी भाजपचे उमेदवार आशिष देशमुख यांच्या विरोधात त्यांचे सख्खे भाऊ डॉ. अमोल देशमुख रिंगणात उतरले होते. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली होती.

तर, काँग्रेसकडून नेते सुनील केदार यांच्या पत्नी अनुजा केदार या लढत होत्या. त्यांच्या विजयासाठी केदार यांनी संपूर्ण ताकद लावली होती. मात्र त्यांना यश आले नाही. जिल्हा बँक घोटाळा प्रकरणात शिक्षा झाल्याने सुनील केदार यांना निवडणूक लढवता आली नाही.

त्यामुळे त्यांच्या पत्नी अनुजा केदार यांना काँग्रेसने तिकीट दिली होती. तर, सुनील केदार यांचे साम्राज्य हलवण्यासाठी भाजपने आशिष देशमुख यांना पुन्हा एकदा संधी दिली होती. या संधीचे देशमुख यांनी सोने केले.

आशिष देशमुख यांनी २०१४च्या निवडणुकीत काटोलमध्ये जाऊन आपले काका अनिल देशमुख यांचासुद्धा धक्कादायक पराभव केला होता. नागपूर जिल्ह्यात सर्व सूत्रे केदारांनी आपल्या हाती घेतली होती. उमेदवारसुद्धा मीच ठरवणार असे ते सांगत होते. रामटेकमध्ये काँग्रेसचे बंडखोर राजेंद्र मुळक यांचा त्यांनी उघडपणे प्रचार केला होता.

हिंगणा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे रमेश बंग यांच्यावर उमेदवारी मागे घेण्यास दबाव टाकला होता. त्यामुळे काँग्रेसचेसुद्धा केदारांच्या दादागिरीला कंटाळले होते. अनुजा केदार यांचा पराभव करून सर्वांनी केदारांना धडा शिकवला असल्याचे बोलले जाते.

# बालपांडे पब्लिक स्कूल येथे मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. २४ :
बालपांडे पब्लिक स्कूल बेसा येथे मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा मुख्य उद्देश निरोगीपणाला प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या समस्या लवकर ओळखणे हा होता.

शिबिराची सुरुवात विद्यार्थी व शिक्षकांच्या सहकार्याने सकाळी ९.०० वा. करण्यात आली. प्रख्यात फिजिशियन डॉ. किटे त्यांच्या टीमसोबत त्यांची सेवा देण्यासाठी उपस्थित होते.

रक्तदाब, रक्तातील साखर, डोळ्यांची तपासणी, दंत तपासणी इत्यादींसह विविध आरोग्य तपासणी चाचण्या घेण्यात आल्या.डॉ. किटे यांनी आरोग्य विषयावर माहितीपूर्ण मार्गदर्शन केले आणि सर्वांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला.

शेवटी शाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे आभार मानले व सर्वांना उत्तम आरोग्य लाभो अशा शुभेच्छा कार्यक्रम यशस्वी केला.

# २३ उपक्रमशील शिक्षक विनोबा पुरस्काराने सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २४ :
जिल्हा परिषदेच्या विविध शाळांमधल्या २३ शिक्षकांना पोस्ट ऑफ मंथ, स्पोकन इंग्लिश व महावाचन उपक्रम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कार्यक्रमात प्राथमिक शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळुसे यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

विनोबा ॲपच्या माध्यमातून दर महिन्यात जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांना पोस्ट- ऑफ-द-मंथ आणि वाचन कौशल्य संवर्धन उपक्रमामधील उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कृत करण्यात येते. याशिवाय दिशा उपक्रम, आर्थिक साक्षरता उपक्रम आणि स्पोकन इंग्लिश उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचाही सन्मान करण्यात येतो.

याप्रसंगी हिंगणा तालुक्यातील दीपाली काठोके, हर्षा मोडक, सरिता वागदे, शुभांगिनी वालदे, दामोधर दवंडे, अवधेश तिवारी, अर्चना पाटमासे, आशा मेश्राम, हर्षदा सोनावणे, अनिता दाढे व शीतल व्यवहारे, रामटेक तालुक्यातील सरिता किनगर, रेणुका साहू व रेणुका धरमठोक, कामठी तालुक्यातील धनराज राऊलकर, भिवापूर तालुक्यातील इंदिरा धुलेवार व अरुण बावणे, मौदा तालुक्यातील राजश्री बाजरे, काटोल तालुक्यातील वंदना घोरमाडे व सोनाली चव्हाण, नरखेड तालुक्यातील तुषार चरडे, सावनेर तालुक्यातील मृणालिनी भाकरे तर उमरेड तालुक्यांतील वसुंधरा किटुकले या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

## फरार आरोपी गजाआड

**नागपूर :** अंमली पदार्थांची विक्री प्रकरणात फरार आरोपीला पकडण्यात गुन्हे शाखा युनिट 4 च्या पथकाला यश मिळाले. शेख अकरम उर्फ बाबा हनीफ शेख (49) रा. बाराखोली, इंदोरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. गत 9 नोव्हेंबरला जरीपटका पोलिसांनी 3 तरुणांना मेफेड्रॉन ड्रग्ससह पकडले होते. त्यांच्या चौकशीत अकरमचे नाव पुढे आले होते. पोलिसांनी त्याच्यावरही गुन्हा दाखल केला. मात्र तो फरार होता. दरम्यान अकरम इमामवाडा ठाण्यांतर्गत अशोक चौक परिसरात फिरत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. पुढील चौकशीसाठी त्याला जरीपटका पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.

## सर्व्हीसिंगच्या बहाण्याने वाहनाची चोरी

**नागपूर :** सर्व्हीसिंगच्या बहाण्याने ठकबाज तरुणाने एका व्यक्तीचे वाहन चोरी केले. ही घटना जुनी कामठी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी मुस्तकीन अहमद कुरेशी (34) रा. शास्त्री चौकच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 18 नोव्हेंबरच्या रात्री मुस्तकीन घरी बसले होते. या दरम्यान अंदाजे 25 वर्षे वयोगटातील तरुण त्यांच्या घरी आला. तुमच्या वडिलांनी दुचाकी वाहन सर्व्हीसिंगसाठी देण्यास सांगितले असल्याची बतावणी केली. त्याच्यावर विश्वास ठेवून मुस्तकीन यांनी वाहनाची चावी त्याला दिली. आरोपी तरुण त्यांची दुचाकी घेऊन फरार झाला.

## बसपाने शहीद गोवारींना केले अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. २४ :
बसपाच्या कही हम भूल ना जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत आज बसपा नेत्यांनी शहीद गोवारी स्मृतिदिन निमित्ताने शहीद गोवारी स्मारकाला पुष्पचक्र वाहून अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, दक्षिण नागपूरचे विधानसभा प्रभारी नितीन वंजारी, अध्यक्ष जितेंद्र पाटील, युवा कार्यकर्ते सचिन मानवटकर, प्रा. गेडाम, अशोक शेवडे आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# आयएमटीतर्फे २०२४ च्या बॅचसाठी भव्य दीक्षांत समारंभाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी (आईएमटी), नागपूरने 23 नोव्हेंबर 2024 रोजी 2022-24 बॅचसाठी भव्य दीक्षांत समारंभ साजरा केला. सुमारे 300 पदवीधर विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी या विशेष कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञान आणि प्रज्ञेचे प्रतीक म्हणून दीपप्रज्वलन आणि सरस्वती वंदनेने झाली.

वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, श्री जयप्रकाश द्विवेदी, यांनी प्रमुख पाहुणे म्हणून या समारंभात हजेरी लावली. त्यांनी विद्यार्थ्यांना सक्षम, धाडसी आणि अपयश स्वीकारण्यास तयार बनविण्यासाठी संस्थेने घेतलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. बदलत्या जगात योग्यतेची गरज अधोरेखित करत त्यांनी म्हटले, "जग वेगाने बदलत आहे आणि हे आव्हाने पार करण्यासाठी नेत्यांची आवश्यकता आहे. नेतृत्व म्हणजे सहकार्याला चालना देणारे वातावरण निर्माण करणे."

यावेळी ओपस (द्विवार्षिक वृत्तपत्र) आणि स्मरणिका (संस्थेच्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा वार्षिक अहवाल) यांचे प्रकाशन जयप्रकाश द्विवेदी आणि डॉ. विज्ञान वर्मा, संचालक, आयएमटी नागपूर, यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे मुख्य सल्लागार कमलनाथ यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या




यशाबद्दल कौतुक केले. त्यांनी विविध दृष्टिकोनांचा स्वीकार करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले, "यश वैयक्तिक उपलब्धींपेक्षा निर्माण होणाऱ्या प्रभावाने मोजले जाते. भविष्य त्यांचे आहे, जे मोठी स्वप्ने पाहतात." आईएमटी नागपूरचे संचालक डॉ. विज्ञान वर्मा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी दीक्षांत समारंभाला संस्थेच्या सर्वात महत्वाच्या आणि प्रेरणादायी कार्यक्रमांपैकी एक मानले. यावेळी त्यांनी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे कौतुक करत, विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. तसेच, आगामी काळात आंतरराष्ट्रीय सहभाग वाढविण्यासाठी संस्थेची वचनबद्धता व्यक्त केली.

दीक्षांत सोहळ्यात आयएमटीच्या उल्लेखनीय माजी विद्यार्थ्यांनाही त्यांच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. 2009-2011 बॅचमधील केयूर भालावत, प्लूटोमनचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना त्यांच्या उद्योजकीय यशासाठी सन्मानित करण्यात आले. तसेच 2007-2009 बॅचमधील साकेत कुमार झा, एसकेएफ अहमदाबादचे सप्लाय चेन, वेअरहाऊस आणि लॉजिस्टिक ऑपरेशन्सचे प्रमुख, यांना नेतृत्व व यशासाठी गौरविण्यात आले.

यानंतर 2022-24 बॅचमधील पदक विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. पीजीडीएम आणि पीजीडीएम (मार्केटिंग) मध्ये सर्वाधिक सिजिपीएसाठी सुवर्णपदक अमन शर्मा यांनी पटकावले. ऋत्विक रुंगटा यांना 'बेस्ट ग्रॅज्युएट स्टुडंट' आणि पीजीडीएम प्रोग्रॅम टॉपरसाठी सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. त्यांना सर्व शाखांमध्ये दुसऱ्या क्रमांकाच्या सिजिपीएसाठी रौप्यपदकही देण्यात आले. पीजीडीएम फायनान्शिअल मॅनेजमेंट प्रकारात सुवर्णपदक कु. झारना जैन यांनी जिंकले, तर रौप्यपदक कमलेश कुंभास यांना मिळाले. पीजीडीएम (मार्केटिंग) प्रकारात रौप्यपदक श्री बी. साई भरद्वाज आणि श्री अनीमेष तिवारी यांनी विभागून जिंकले. पीजीडीएम प्रकारातील रौप्यपदक जेसन एस पुनन यांनी प्राप्त केले. डॉ. विज्ञान वर्मा यांनी व्यवस्थापन शपथ घेतली आणि विद्यार्थ्यांना डिप्लोमा प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुणे आणि संचालक यांच्या हस्ते प्रत्येक विद्यार्थ्याला डिप्लोमा देण्यात आला.

समारंभाची सांगता डॉ. राजनंदन पटनायक, वरिष्ठ डीन , यांनी आभारप्रदर्शनाने केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कावेरी मुखर्जी यांनी अत्यंत सुंदर आणि प्रभावीपणे केले. त्यांच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाने कार्यक्रम अधिक यशस्वी झाला. विद्यार्थ्यांनी आपले काळे टोप हवेत उडवून आपल्या कष्टाचे आणि यशाचे प्रतीक म्हणून आनंद साजरा केला.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **AZIZ ABDUL GHANI FARIDA FATEMA ABDUL.** NOW MY NEW NAME IS **FARIDA FATEMA.** **ADD :** PLOT NO. 02 PALLOTI NAGAR KATOL ROAD NAGPUR 440013.

MY OLD NAME WAS **SHUBHANGI SHRAWAN TOMASKAR.** NOW MY NEW NAME IS **SHUBHANGI OMKAR KARIYAR.** **ADD :** HOUSE NO 134 GURUKRUPA NIWAS IMAMAWADA NAGPUR- 440003.

MY OLD NAME WAS **SAWATRI TAHLYOMAL TAKHTANI.** NOW MY NEW NAME IS **HEENA DILIPKUMAR CHAWLA.** **ADD :** B NO 241 MAIN BAZAR ROAD JARIPATKA NAGPUR 440014.

# महायुती सुपरहिट..



इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचे सारे गणित चुकले, आघाडीचे सर्व अंदाज फसले, मतदारांनी महाआघाडीचे सर्व दावे फेटाळून लावले आणि महाआघाडीच्या नेत्यांचे फेक नॅरेटिव्ह (बनावट कथानक) धुडकावून दिले. महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशापुढे महाआघाडीचा साफ धुव्वा उडाला. महायुतीच्या मुसंडीपुढे महाआघाडी चितपट झाल्याचे बघायला मिळाले. या निवडणुकीत शिवसेना खरी कोणती व शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचा वारस कोण याचे सडेतोड उत्तर मतदारांनी दिले. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे महायुतीचे त्रिशूळ सुपरहिट ठरले. अकेला देवेंद्र क्या करेगा, या प्रश्नाला मतदारांनी सणसणीत उत्तर दिले. एक है तो सेफ है आणि कटेंगे तो बटेंगे या घोषणांना जातीय व धार्मिक रंग देणाऱ्या महाआघाडीच्या नेत्यांना मतदारांनी पराभवाच्या दरीत ढकलून दिले. महायुतीला मिळालेल्या विक्रमी यशामुळे महाराष्ट्राला मतदारांनी स्थिर सरकार दिले आहे. महायुतीला मिळालेला प्रचंड विजय म्हणजे विकासाचा विजय आहे. महायुतीच्या कारभारावर राज्यातील मतदारांनी प्रचंड विश्वास व्यक्त केला आहे. महायुतीच्या यशाचे शिल्पकार हे एकनाथ शिंदे यांच्याबरोबरच देवेंद्र फडणवीस आहेत हे सत्य आहे.

---------------

सन २०१४ मध्ये भाजपाचे १२३ आमदार निवडून आले होते, सन २०१९ मध्ये भाजपाचे १०५ आमदार विजयी झाले होते आणि २०२४ मध्ये भाजपाच्या १२० पेक्षा जास्त आमदारांना मतदारांनी विधानसभेत पाठवले आहे. विधानसभेच्या सलग तीन निवडणुकांमध्ये भाजपाचे शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून येत आहेत, हा मोठा विक्रम आहे व या विक्रमाचे कर्ते-करविते देवेंद्र फडणवीस हेच आहेत.

२०१४ मध्ये पक्षाने त्यांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली, या संधीचे त्यांनी सोने केले. सलग पाच वर्षे मुख्यमंत्री म्हणून काम करणारे वसंतराव नाईकांनंतरचे दुसरे नेते अशी महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांची नोंद झाली.

२०१९ मध्ये भाजपाचे सर्वाधिक आमदार असतानाही त्यावेळी मित्रपक्ष असलेल्या उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या मोहापायी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसशी घरोबा केला. उद्धव यांना अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद मिळाले. नंतर शिवसेनेत बंडाचा झेंडा फडकवणाऱ्या एकनाथ शिंदे यांना भाजपाने उदार मनाने मुख्यमंत्रीपद दिले.

एकनाथ शिंदे यांनी जे धाडस दाखवले त्याची बक्षिसी म्हणून भाजपाने त्यांना महाराष्ट्राचे सर्वोच्च पद दिले. त्यामुळे विधानसभेत सर्वाधिक आमदार असूनही गेल्या पाच वर्षांत भाजपाला म्हणजे फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदापासून लांब राहावे लागले.

राजकीय तडजोड आणि पक्षाचा निर्णय यासाठी देवेंद्र यांनी पक्ष जे सांगेल त्याचे पालन केले. पहिली अडीच वर्षे विरोधी पक्षनेते पद व नंतर अडीच वर्षे उपमुख्यमंत्रीपदावर त्यांनी काम केले. आघाडीचा धर्म पाळताना त्यांनी कधीही नाराजी प्रकट केली नाही. मुख्यमंत्रीपदाचा आदर राखत त्यांनी गेली अडीच वर्षे एकनाथ शिंदे यांना सदैव मानसन्मान दिला.

आता २०२४ च्या निकालानंतर त्यांना मुख्यमंत्रीपद मिळणार का, हा भाजपामध्ये लाखमोलाचा प्रश्न आहे. गेली पाच वर्षे त्यांनी त्याग केला, संयम पाळला, पक्ष शिस्त पाळली आणि पुन्हा भाजपाचे सर्वाधिक तेही शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आणले म्हणून त्यांनाच मुख्यमंत्रीपद मिळावे, अशी पक्षातून जोरदार अपेक्षा व्यक्त होते आहे. अर्थातच याचा निर्णय एकनाथ शिंदे यांना न दुखवता मोदी-शहा व नड्डांना घ्यावा लागणार आहे.

सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाला मोठा फटका बसला होता. राज्यातील ४८ पैकी ३१ जागांवर महाआघाडीचे खासदार निवडून आले, तर केवळ १७ जागांवर महायुतीला विजय मिळाला होता. गेल्या लोकसभेत भाजपाचे महाराष्ट्रातून २३ खासदार निवडून गेले होते, तर यंदा भाजपाचे केवळ ९ च खासदार विजयी झाले. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपावर मोठी नामुष्की आली होती. त्या निकालापासून भाजपाने बोध घेतला. झालेल्या चुका दुरुस्त केल्या. लोकसभा निकालानंतर महायुती सरकारने ज्या कल्याणकारी योजनांचे निर्णय घेतले व त्याची तडफेने अंमलबजावणी केली, त्याचे फळ महायुतीला विधानसभा निवडणुकीत मिळाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महायुतीला लाभ देणारी सर्वात शक्तिशाली योजना ठरली. किंबहुना लाडकी बहीण योजना या निवडणुकीत गेमचेंजर ठरली. राज्यातील दोन कोटी चाळीस लाख बहिणींनी या योजनेसाठी अर्ज दाखल केले. दरमहा १५०० रुपये त्यांच्या बँक खात्यात थेट जमा होऊ लागले. बहिणींचा विश्वास महायुती सरकारवर वाढला.

एवढेच नव्हे, तर महायुतीने पुन्हा सत्तेवर आल्यावर २१०० रुपये दरमहा देऊ असे बहिणींना आश्वासन दिले. लाडकी बहीण योजनेच्या विरोधात दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावल्याने ही योजना चालूच राहणार याची बहिणींना खात्री वाटू लागली. ही योजना लोकप्रिय होत आहे हे लक्षात आल्यावर महाआघाडीने आपण सत्तेवर आल्यावर तीन हजार रुपये देऊ असे आश्वासन दिले. महायुतीने महाराष्ट्रात महिलांना निम्म्या तिकिटात एसटी बस प्रवास दिला आहे, त्यावर कुरघोडी करण्यासाठी महाआघाडीने आपण सत्तेवर आल्यावर महिलांना बस प्रवास मोफत देऊ असे जाहीर केले.

एवढेच नव्हे, तर मुंबईतील लोकल प्रवास महिलांना मोफत द्यावा म्हणून केंद्राकडे पाठपुरावा करू असेही महाआघाडीचे विशेषतः उबाठा सेनेचे नेते सांगू लागले. महाआघाडीची आश्वासने म्हणजे बोलाचीच कढी व बोलाचाच भात असल्याचे लाडक्या बहिणींनी ओळखले. म्हणूनच यंदा राज्यात महिलांचे मतदान जास्त झाले व ते महायुतीला झाले. हा सर्वात मोठा लाभ भाजपा, शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या पक्षाच्या उमेदवारांना मिळाला.

लोकसभा निवडणुकीत केंद्रात भाजपा सत्तेवर आल्यानंतर संविधान बदलणार आहे, संविधान बदलण्यासाठी भाजपाने ४०० पार अशी घोषणा दिली आहे, असा प्रचार आघाडीने केला होता. तशा प्रचाराचा उपयोग विधानसभेला झाला नाही.

संविधान बदलण्याच्या फेक नॅरेटिव्हवर मतदारांनी विश्वास ठेवला नाही. लाडकी बहीण योजना निवडणुकीपुरतीच आहे, नंतर बंद होणार आहे, असाही आघाडीने प्रचार केला पण त्यावरही बहिणींनी विश्वास ठेवला नाही. मोदी-शहा महाराष्ट्रातील प्रचार अर्धवट सोडून निघून गेले अशाही पुड्या आघाडीने सोडल्या, पण लोकांनी त्यांचे कथानक गंभीरपणे घेतले नाही.

फुटीर आमदारांविषयी सर्वोच्च न्यायालयाने तारीख पे तारीख देणे चालूच ठेवले आहे व सुनावणीच घेतली जात नाही म्हणून उबाठा सेनेने बराच थयथयाट केला. निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह बहाल केले. निवडणूक आयोगाने भाजपाला पाहिजे तसा निकाल दिला म्हणून उबाठा सेनेने आयोगावर धारदार टीका केली. पण विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने जनतेच्या न्यायालयानेही केवळ उबाठापेक्षा नव्हे तर महाआघाडीपेक्षा जास्त जागांवर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला कौल दिला व खरी शिवसेना ही शिंदे यांचीच आहे असा निर्णय दिला. शिवसेनाप्रमुखांचे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचे वारसदार हे एकनाथ शिंदे हेच आहेत, हाच या विधानसभा निकालाचा अर्थ आहे.

महाआघाडीचा नकारात्मक प्रचार लोकांना आवडला नाही. आम्ही सत्तेवर आल्यावर धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे अदानींना दिलेले कंत्राट रद्द करू असे उबाठा सेना सतत सांगत होती. मोदी सरकारने गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातले मोठे उद्योग व गुंतवणूक गुजरातला पळवली अशा आरोपांचा भडीमार चालवला होता.

महायुतीने मात्र विकासाच्या मुद्द्यांवर भर दिला. समृद्धी मार्ग, कोस्टल रोड, अटल सेतू, मेट्रोचे जाळे, हे सर्व लोकांना दिसते आहे. लाडक्या बहिणींप्रमाणेच लाडका भाऊ, ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थ यात्रा, बेरोजगार सुशिक्षित तरुणांसाठी अर्थसहाय्य आदी योजना वेगाने सुरू केल्या.

लोकसभा निवडणुकीत उबाठा सेनेच्या पक्षप्रमुखांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागल्यामुळे जी काही सहानुभूती मिळाली, तशी विधानसभा निवडणुकीत मिळाली नाही. तसेच मुस्लीम व्होट बँकेच्या आधारावर निवडून येता येत नाही हे या निकालाने दाखवून दिले.

मराठा आंदोलकांचे नेते मनोज जरांगे यांच्या नाराजीचा फटका महायुतीला मोठा बसेल असे अगोदर वाटले होते, पण तसे काही घडले नाही. जरांगे यांची धरसोड वृत्ती त्याला कारणीभूत ठरली. त्यांच्यावर या निवडणुकीत कोणीही टीका केली नाही. महायुती सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी एकनाथ शिंदे यांनी केलेले अविरत प्रयत्न व त्यांची तळमळ या समाजाने बघितली आहे. मराठा आरक्षणाचा संवेदनशील मुद्दा एकनाथ शिंदे यांनी काळजीपूर्वक हाताळला, मराठा समाजाचा विश्वास संपादन केला. त्यामुळे मराठा समाजानेही महायुतीला चांगले मतदान केले.

लोकसभा निवडणुकीत भाजपाचे केंद्रीय नेते व प्रदेश नेते तसेच सरकारमधील नेते यांनी शरद पवारांचे नाव घेऊन खरपूस टीका केली होती. ८४ वर्षांच्या पवारांचा उल्लेख भटकती आत्मा असा केल्याने सर्वसामान्य जनतेत पवारांविषयी सहानुभूती निर्माण झालीच पण अशी टीका महाराष्ट्राच्या परंपरेलाही साजेशी नव्हती. विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या केंद्रीय नेत्यांनी व महाराष्ट्रातील नेत्यांनी पवारांचे थेट नाव घेण्याचे टाळले व त्यांच्यावर कोणतीही थेट टीकाही टाळली. त्याचा लाभ महायुतीला झाला.

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते शांत होते, अजित पवारांना भाजपाने बरोबर घेणे त्यांना पसंत नव्हते. त्यावर भाजपाने डॅमेज कंट्रोल केले. विधानसभा निवडणुकीत संघाची फौज कार्यरत होती. तसेच अजित पवारांना बरोबर घेणे हा मुद्दा नुकसानीचा ठरणार नाही, याची भाजपाने दक्षता घेतली.

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाने काँग्रेस पक्ष विधानसभा निवडणुकीत गाफील दिसला. उमेदवारांची निवड व जागावाटप यात झालेला विलंब काँग्रेसला भोवला. काँग्रेस नेत्यांमध्ये लोकसभेतील विजयाचा फाजिल आत्मविश्वास जाणवला. विधानसभेच्या निकालानंतर मुख्यमंत्री कोण, नाना पटोले की बाळासाहेब थोरात, जयंत पाटील की पहिली महिला मुख्यमंत्री म्हणून सुप्रिया सुळे अशी चर्चा चालू राहिली.

उबाठा सेनेचे उद्धव ठाकरे हे तर राजमुकुट मस्तकावर चढविण्यासाठी सर्वात जास्त उत्सुक आहेत, असे चित्र महाराष्ट्राला दिसले. जनतेच्या प्रश्नांपेक्षा सत्ता मिळवणे व अदानींवर सूड घेणे यातच महाआघाडीला जास्त रस आहे, असे दिसून आले. अशा नकारात्मक भूमिकेला मतदारांनी झिडकारले. उलट महायुतीची एकजूट, विकासाचा मुद्दा, जागावाटप आणि उमेदवार निवडीपासून विजयापर्यंत सूक्ष्म व्यवस्थापन हे महाआघाडीला भारी ठरले.

महायुतीने वृत्तपत्रे, टीव्ही चॅनेल्स, सोशल मीडिया, यूट्यूब, अगदी ट्रेन-बसमध्ये केलेला प्रचार हा महाआघाडीपेक्षा अधिक कल्पक व प्रभावी होता. एक है तो सेफ है, या घोषणेवर महाराष्ट्रातील मतदारांनी शिक्कामोर्तब केले, हाच या निकालाचा अर्थ आहे.

●●●●●●●●●

# मानवी जीवन आणि उत्क्रांतीवाद

डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धान्ताला त्याच्या काळापासूनच विरोध होत आला आहे आणि या विरोधात सनातन्यांनी कायम महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अनेक ज्ञानीगुणी जण आणि पुढारी यांनी देखील अलीकडेच उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला खोटे ठरवण्याचे प्रयत्न केलेत, त्यानिमित्ताने या विरोधांचा घेतलेला मागोवा.



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

पूर्वार्ध

---------------

डार्विन आणि उत्क्रांतिवाद हे जणू एक समीकरणच मानले जाते. उत्क्रांती म्हणजे निसर्गानुसार सजीवांमध्ये होणारे आणि खूपच हळूहळू अंगिकारले जाणारे बदल होय. पृथ्वीच्या उत्पत्तीपासून होत आलेले हे बदल सजीवांच्या उदयास अनुकूल होते. चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा जन्म दि. १२ फेब्रुवारी १८०९ साली इंग्लंड येथील शोर्पशायर शहरातील श्रेब्स्बुरी या गावी झाला.

ते एक ब्रिटिश पदार्थशास्त्रज्ञ आणि भूवैज्ञानिक होते. विज्ञानाच्या विकासात त्यांचे मोलाचे योगदान आहे. डार्विन हे प्रामुख्याने विज्ञानाच्या विकासात त्यांच्या योगदानासाठी जाणले जातात. त्यांनी मानवाच्या उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांना साध्या सरळ प्रयोगांच्या माध्यमाने जगापुढे आणले. त्यांच्या निरीक्षणांमुळे उत्क्रांती आणि नैसर्गिक निवडीवर त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले आहे.

जेव्हा त्यांनी प्रजातींच्या उत्पत्तीवर प्रकाशित केले तेव्हा आपले जग कायमचे बदलले होते. डार्विनच्या नैसर्गिक निवडीच्या शोधाची व्याख्या चार तत्त्वांनी केली जाते. म्हणजेच, प्रत्येक प्रजातीमध्ये भिन्नता असते. या फरकांमध्ये रंग, वजन, उंची आणि इतर वैशिष्ट्ये यांचा समावेश आहे.

उत्क्रांती सिद्धांताचे महत्त्वाचे मुद्दे-

१) एखाद्या विशिष्ट प्रजातीच्या अनेक प्रजातींच्या वनस्पती पूर्वी सारख्याच होत्या, परंतु जगातील विविध ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीमुळे त्यांची रचना बदलली त्यामुळे त्या एका प्रजातीच्या अनेक प्रजाती झाल्या.

२) वनस्पतींसारख्या प्राण्यांच्या बाबतीतही असेच आहे, मानवाचे पूर्वज एकेकाळी माकडे होती, पण काही माकडे वेगळ्या पद्धतीने जगू लागली. हळूहळू गरजांनुसार त्यांचा विकास होत गेला, तो माणूस झाला. अशा रीतीने, वातावरण आणि परिस्थितीनुसार जीवांमध्ये हळूहळू बदल होणे किंवा अनुकूल कार्य करणे आणि परिणामी जीवांच्या नवीन प्रजातींची उत्पत्ती होणे, याला उत्क्रांती म्हणतात. चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांची डिसेंट ऑफ मॅन आणि ओरिजीन ऑफ स्पेशीज ही पुस्तके प्रचंड प्रमाणात प्रसिद्ध झाली. ऑन द ओरिजीन ऑफ स्पेसीज या पुस्तकातून त्यांनी उत्क्रांतिवादाचा सिद्धांत मांडला. त्यामुळेच २४ नोव्हेंबर हा दिवस डार्विन डे म्हणूनही प्रसिद्ध पावला आहे.

बीगल या जहाजावरून डार्विन परतला. तेव्हा त्याच्या डोक्यात विचारांची चक्रे फिरत होती. आपले विचार त्याने शब्दबद्ध करून त्याचे भूशास्त्रज्ञ गुरू चार्ल्स लायेल यांना दाखवले. त्यांच्या सल्ल्यावरून फापटपसारा छाटून ते त्याने पुन्हा लिहून काढले. हे विचार प्रसिद्ध करायचे धाडस चार्ल्स डार्विनमध्ये नव्हते. त्यांची पत्नी प्रचंड धार्मिक होती. त्यामुळे त्यांचे ऱ्जगण्यासाठी योग्य ते बदल ज्या प्राण्यांमध्ये घडतात आणि अशा तऱ्हेने बदल घडल्यामुळे जे प्राणी बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेऊ शकतात, तेच जगतात, बाकीचे कालौघात नष्ट होतात. ही प्रक्रिया कोट्यवधी वर्षे चालू असते, हे नवे विचार तिला धक्कादायक वाटणार, याबद्दल त्यांना खात्री वाटत होती. त्यामुळेच या विचारांचे साडेचारशे-पाचशे पानांचे हे हस्तलिखित त्यांनी बरीच वर्षे दडवून ठेवले होते.

एक दिवस त्याला एक पार्सल मिळाले. अल्फ्रेड रसेल वॉलेस नावाच्या माणसाने डच इस्ट इंडिजमधून ते पाठवले होते. ते पुडके उघडून त्यातला मजकूर वाचून डार्विनला काय करावे ते सुचेना. त्याच्या सुमारे ५०० पानी प्रबंधाचे सार या वॉलेस नावाच्या स्वशिक्षित माणसाने त्याच्या निरीक्षणांचे निष्कर्ष म्हणून डार्विनकडे २४ पानांत पाठवले होते.

आपण कृपया हे ब्रिटिश असोसिएशन ऑफ सायन्सेसच्या सभेत सादर करावे, अशी विनंती त्यासोबतच्या पत्रात होती. आता काय करावे, या पेचातून चार्ल्स लायेलनी पुढाकार घेऊन त्याची सुटका केली. नाहीतर डार्विन त्याचे हस्तलिखित जाळायला निघाला होता. तसे झाले असते तर हा सिद्धांत नंतर कधीतरी मांडला गेलाही असता आणि कदाचित तो सहजपणे स्वीकारलाही गेला असता, पण या झाल्या जर-तरच्या गोष्टी.

लायेल आणि डॉ.हुकर- जोसेफ डाल्टन यांनी वॉलेस यांच्याशी संपर्क साधला. वॉलेसनी उदार मनाने हा सिद्धांत दोघांचा असावा, हे मान्य केले. मुख्य म्हणजे ह्या जोडगोळीनं जो सिद्धांत मांडला, त्यात माणसासंबंधी अवाक्षरही काढले नव्हते.

अखेरीस एकदा हा शोधनिबंध दोघांच्या नावे १ जुलै १८५८ रोजी लिनियन सोसायटीच्या सभेत वाचला गेला. त्यानंतर डार्विनने 'द ओरिजिन ऑफ स्पेसीज थ्रू नॅचरल सिलेक्शन' हा ग्रंथ प्रकाशकाला छापण्यासाठी दिला. तो २४ नोव्हेंबर १८५९ या दिवशी बाजारात आला. त्याची पहिली आवृत्ती १२५० प्रतींची होती. ती पहिल्याच दिवशी हातोहात संपली. त्यानंतर जी वादविवादांना सुरुवात झाली ती अजून शमलेली नाही!

स्वर्गीय निर्मात्याच्या निर्मितीच्या तत्त्वाविरुद्ध असलेले पाखंडी पुस्तक असे मत क्वार्टर्ली रिव्ह्यूने या पुस्तकाबद्दल नोंदवले. तर तितक्याच एका नावाजलेल्या 'लिटररी रिव्ह्यू' या नियतकालिकाने अत्यंत किरकोळ आणि बिन महत्त्वाच्या थातुरमातुर घटनांच्या आधारे केवळ कल्पनाशक्ती आणि तर्कदुष्टता यांचा मेळ घालून निर्माण केलेले चोपडे, अशी या ग्रंथाची संभावना केली.

खरे तर डार्विनने ओरिजिन ऑफ स्पेसीज या ग्रंथात मानवाच्या उत्पत्तीबद्दल लिहिणे टाळले होते. हे स्वतः डार्विनला डाचत होते. त्यामुळेच त्यांनी ग्रंथाच्या सुरुवातीलाच सर्व समविचारी शास्त्रज्ञांच्या संशोधनांची माहिती दिली होती आणि अखेरच्या प्रकरणात यामुळे माणसाच्या निर्मितीवर प्रकाश टाकण्यास मदत होईल, अशा अर्थाचे एक वाक्य टाकले होते.

या एका वाक्यामुळे लोकमत प्रचंड क्षुब्ध झाले. द एथेनिअम' या नियतकालिकाने एवढ्या एका वाक्याचे प्रचंड भांडवल केले. माकडापासून माणूस बनला, अशा तऱ्हेचा एक नवा पंथ डार्विन तयार करणार, हा त्यांच्या बातमीचा मथळा होता. यानंतरचा मोठा वाद ब्रिटिश असोसिएशन ऑफ एडव्हान्समेंट ऑफ सायन्सेसच्या जून १८६०च्या सभेत झाला.

डार्विनच्या विचारांना सॅम्युएल विल्बरफोर्स- बिशप ऑफ ऑक्सफर्ड डार्विनवादाला कायमस्वरूपी मूठमाती देणार, अशा तऱ्हेचं वर्णन सभेच्या आधीच वृत्तपत्रांनी छापले होते. सर्वसाधारणपणे वैज्ञानिक सभेकडे कुणी फिरकत नाही. मात्र या सभेला सातशेहून अधिक लोक त्या दिवशी मुख्य सभागृहात उपस्थित होते.

अनेक लोक सभागृहाच्या बाहेर उभे होते. डार्विनची नेहमीप्रमाणे प्रकृती अस्वास्थ्याची-मंचावर जायच्या भीतीने डार्विनचं पोट दुखू लागायचे ही सबब आता लोकांना ठाऊक झाली होती. त्यामुळे टी.एच.हक्सले हे त्यांची म्हणजे डार्विनची बाजू मांडणार होते.

बिशप बोलता बोलता हक्सले यांच्याकडे बघून म्हणाले, तुम्हाला डार्विन यांचं म्हणणं मान्य आहे, तेव्हा मला एक बाब स्पष्ट करून सांगाल का? तुमचं माकडांशी असलेलं नातं वडिलांच्या घराण्याकडून आहे की आईच्या? टाळ्यांचा कडकडाट झाला. थॉमस हक्सले शेजाऱ्याजवळ कुजबुजले, देवानंच या बिशपला माझ्या जाळ्यात फसवलाय! बिशपचे भाषण संपले.

हक्सली बोलायला उठले. त्यांनी आधी उपस्थितांना उत्क्रांतीवाद समजावून सांगितला. मग विल्बरफोर्सच्या युक्तिवादाचे बारा वाजवले आणि शेवटी ते म्हणाले, आपल्याला ज्या विषयात गम्य नाही, ज्याची आपल्याला काडीचीही माहिती नाही, त्या विषयात नाक खुपसणाऱ्या एखाद्या वाचाळ माणसापेक्षा (इथं त्यांनी बिशप विल्बरफोर्सवर नजर रोखली.) एखादा माकड मी माझा पूर्वज म्हणून पसंत करीन. हक्सले यांच्या भाषणानंतर इंग्लंडमध्ये डार्विनवादाच्या विरोधात पद्धतशीरपणे वातावरण पेटवायचे प्रयत्न झाले.

युरोपनं डार्विनवाद पूर्णपणे स्वीकारला नव्हता. लुई अगासीझसारख्या मान्यवर भूशास्त्रज्ञाने त्याला विरोध केलाच, पण ते अमेरिकेत व्याख्यान दौऱ्यासाठी गेले असताना त्यांनी डार्विनवादाविरोधात प्रचार केला. अमेरिकेतील दक्षिणी राज्यांनी ह्या विरोधाचे स्वागत केले. आजही अमेरिकेत डार्विनप्रणीत उत्क्रांतीवादाला जो विरोध होतोय तो ह्या सनातनी दक्षिण राज्यांमध्येच मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो. तिथे अजूनही फ्लॅट अर्थ सोसायटीसारख्या संस्था कार्यरत आहेत.

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

●●●●●

# आरएसएसचा मास्टरप्लॅन सक्सेस

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाने अनेकांना धक्का दिला. काहीजण तर अजूनही या धक्क्यातून सावरलेले नाहीत. तर या भव्यदिव्य यशाचे आणि तितक्याच मोठ्या पराभवाचे विश्लेषण सुरू झाले आहे. खरंतर भाजपाच्या या यशाचं गुपित म्हणा अथवा चावी म्हणा ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे होती हे ओपन सीक्रेट आहे.

मतमोजणीतील नवीन आकडेवारीनुसार भाजपाच्या नेतृत्वात लढलेल्या महायुतीला 288 जागांपैकी 235 इतक्या विक्रमी जागा मिळाल्या आहेत. तर काँग्रेस-उद्धव ठाकरे सेना आणि शरद पवार गटाच्या महाविकास आघाडीला केवळ 46 जागा मिळाल्या आहेत.

लोकसभेवेळी भाजपाच्या काही बड्या नेत्यांनी आता आम्हाला विजयासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची गरज नसल्याचा कांगावा केला. त्यावरून एकच वादळ उठलं. संघ आणि भाजपातील संबंध ताणल्या गेले. लोकसभा आणि काही राज्यातील निवडणुकीत भाजपाचे हात पोळले. पण विधानसभेला ही चूक भाजपाने टाळली. जे.पी. नड्डा यांचा एक कार्यक्रम वगळता ते या निवडणुकीत फिरून दिसले नाहीत. पुढील सूत्र संघाने हाती घेतल्यानंतर भाजपाला विजयाचा मार्ग सुकर झाला.

सूत्रांनुसार, संघाने त्यांच्या संघटन कौशल्याचा मुख्य वापर केला. छोट्या-छोट्या गटा संघ



स्वयंसेवकांनी राज्यातील काना-कोपऱ्यात बैठकांवर जोर दिला. त्या भागातील सामाजिक, राजकीय समस्या जाणून घेतल्या. अनेक कुटुंबाशी थेट संपर्क साधला. या संपर्कात राष्ट्रभान, राष्ट्र हित, हिंदुत्व, सुशासन, विकास, लोक कल्याण आणि एकसंघ समाज तसेच स्थानिक विकासाच्या मुद्दावर लोकांना आश्वस्त करण्यात आले.

संघाची विश्वासर्हता यासाठी कामी आली. या बैठकांमध्ये भाजपाला थेट मतदानाचे आवाहन टाळण्यात आले. तर पुरक मुद्यांवर त्या विचारांच्या पक्षाला मतदान करण्याचे सूचवण्यात आले, हे विशेष.

**मराठा-ओबीसी वाद**

राज्यात मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाने राज्यात मोठा संभ्रम तयार झाला. हिंदूमधील दोन गटात गैर समजाचे वातावरण तयार झाले. वैचारिक लढाईला जातीय ध्रुवीकरणाचे वंगण देण्याचा प्रयत्न संघाने हेरला. दोन्ही समाजातील तरुणाईपर्यंत हिंदू विचार, हिंदू हितावर, राष्ट्र हित हा विचार पोहचवला. त्यांनी कोणत्याही समाजाला दुखवले नाही. कोणतेही आश्वासन दिले नाही. पण विचारानेच विचारावर मात केल्याचे निकालातून दिसून आले. हिंदू विचारांवर दोन्ही गट एकत्र आले.

**भाजपाचा संघावर भरवसा**

आतापर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भाजपाला ग्राऊंडवर मोठी मदत केली आहे. संघटना राजकारणात नसली तरी त्यांची राजकीय विचारधारा सांभाळणाऱ्या भाजपाला संकटात त्यांनी मदत केली आहे. त्यामुळे भाजपाचा संघावर भरवसा आहे. त्याला आतापर्यंत संघाकडून कधीच तडा गेलेला नाही. विधानसभेचे मतदान होताच त्यामुळेच देवेंद्र फडणवीस यांनी सरसंघचालक मोहन भागवतांची भेट घेतली होती.

●●●●●●●●●

# हिवाळ्यात रोज करा रताळ्याचे सेवन



रताळ्याचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. हिवाळ्यात रताळ्याचे सेवन आवर्जून करण्याचा सल्ला दिला जातो. रताळ्याचे सेवन केल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि वजन कमी करण्यासाठी देखील रताळे फायदेशीर ठरतात.

रताळ्याचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. रताळे हे फायबर, जीवनसत्वे आणि खनिजे यांचा उत्कृष्ट स्त्रोत आहेत. यामध्ये अँटिऑक्सिडंट देखील असतात. जे शरीराला मुक्त रॅडिकल्स मुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करण्यास मदत करतात. ज्यामुळे जुनाट आजार होण्याची शक्यता कमी असते. यासोबतच त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स बटाट्याच्या तुलनेत कमी असतो. ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते. जाणून घेऊया रताळ्याचे आरोग्याला होणारे फायदे.

**हाडांसाठी फायदेशीर**

रताळ्यामध्ये व्हिटॅमिन डी आढळते जे हाडे मजबूत करण्यास मदत करते. हे जीवनसत्वे दात, हाडे, त्वचा आणि मज्जातंतूच्या वाढीसाठी आणि मजबुतीसाठी आवश्यक आहे.

**लोहाचा चांगला स्त्रोत**

रताळ्यामध्ये लोह मुबलक प्रमाणात आढळते. शरीरात लोहाच्या कमतरतेमुळे ऊर्जा कमी राहते आणि त्याचा तुमच्या रोगप्रतिकारक शक्तीवरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत रताळ्याचे सेवन लोहाची कमतरता दूर करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

**रक्तातील साखर कमी करते**

रताळ्यामध्ये कॅरोटीनॉइड नावाचे तत्व आढळते. जे रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. त्याचबरोबर यामध्ये आढळणारे व्हिटॅमिन बी 6 हृदयरोगावरही फायदेशीर ठरू शकते.

**किडनीसाठी फायदेशीर**

रताळे पोटॅशियमचा चांगला स्त्रोत मानला जातो. जे तुमची मज्जासंस्था सुधारण्यास मदत करते. यासोबतच हे किडनी निरोगी ठेवते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते**

रताळ्यातील व्हिटॅमिन ए तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. एक रताळे तुमच्या शरीराला 102% व्हिटॅमिन ए पुरवते. रताळे आतड्यांचा स्तर देखील राखतो. जे हानिकारक रोगजनकांना आतड्यात जाण्यापासून प्रतिबंधक करते.

**वजन कमी करण्यास मदत**

उच्च फायबर सामग्री कमी ग्लायसेमिक इंडेक्स आणि मंद पचन यामुळे वजन कमी करण्यासाठी रताळे खाणे योग्य मानले जाते.

●●●●●

## अशोकायन

### बोलघेवडे

बोलेल तो तोलेल काय?
गर्जेल तो पडेल काय ?
जनता याचाही अंदाज
घेत असते बरं काय ?

बिनबुडाचे आरोप करणे
जनतेलाही मान्य नसते
तोलुन मापून बोलण्यात
खरचं भौ शक्ति असते ..

इतरांचं पहावं वाकुन
स्वत:चं ठेवावं झाकुन
ये पब्लीक है भाई
ती ही घेत असते समजुन..



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# तेजस संस्थेने भुकेल्यांना अन्न व किराणा सामानाचे केले वाटप

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २४ :

तेजस बहुउदेशीय संस्थेच्या दानवीर तर्फे भुकेल्यांना अन्न व किराणा साहित्याचे वाटप करण्यात येत असून या अभियानात कामठी कँटचे माजी उपाध्यक्ष महेंद्र भुटानी, नागपूरचे विदर्भ नेते सी.ए.सुनील चोखारे, सीए शिल्पी टिब्रीवाल, तिवारी गॅस एजन्सीचे संचालक बबलू तिवारी, सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र उर्फ मोंटू भुटानी, राजू अग्रवाल जीडी, महाराष्ट्र टेक्सटाईल सेंटर कामठीचे मनोज बत्रा, उपजिल्हा रुग्णालय कामठीच्या प्रभारी नयना दुफारे, सामाजिक कार्यकर्त्या रजनी पिल्लई मॅडम, संस्थेचे मार्गदर्शक एम.ए.जब्बार, संस्थेचे उपाध्यक्ष देविदास पेटरे, संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष चंद्रशेखर



अरगुलेवार यांच्या कडून अन्न गोड़ा करुण हे अन्न भुकेल्या, अपंग आणि निराधार लोकांना दिले जाते.

जयभीम चौक, भाजी मंडी , कुंभारे कॉलनी, कादर झंडा मस्जिदच्या मागे, छोटी अजनी, कन्हान सत्रापूर येथे प्रत्येक महिन्या प्रमाणे आज दिनांक 22/11/2024 रोजी 10 किलो तांदूळ, 10 किलो गहू आणि किराणा सामानचे वाटप करण्यात आले. वाटप करतांना संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, मार्गदर्शक. एम.ए. जब्बार, सदस्य नरेश शिंदे, अर्जुन उपासे, अभय पेटारे, आकाश जगनित, विभा पाटिल उपस्थित होते. हे कार्य तेजस संस्था तर्फे 5 वर्ष पासून सतताने पार पड़त आहे. अरगुलेवार यांनी कामठी येथे वृद्धाश्रम स्थापन करण्याची इच्छा असल्याचे सांगून जनतेला मदतीची विनंती केली.

## मजुरावर प्राणघातक हल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

अज्ञात आरोपीने एका मजुरावर दगड आणि विटांनी हल्ला करून गंभीर जखमी केले. ही घटना जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत घडली. ललित शंकर मडावी (35) रा. बाराखोली, इंदोरा असे जखमीचे नाव असून त्याच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी सायंकाळी 4.40 वाजताच्या सुमारास ललित नारा गावातील रसोई हॉटेलजवळून जात होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने त्यांचा मार्ग अडवला. कोणताही वाद नसताना ललितवर दगड आणि विटांनी हल्ला चढवला. डोके आणि चेहऱ्यावर वार करून रक्तबंबाळ केले आणि पळून गेला. घटनेची माहित मिळताच जरीपटका पोलिस घटनास्थळी पोहोचले. गंभीर जखमी अवस्थेत ललितला उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनीजिवे मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# बैलवाड्यात विजयोत्सव साजरा



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

नागपूर तालुक्यातील बैलवाडा येथे समीर मेघे यांनी हिंगणा विधानसभा क्षेत्रात हॅट्रीक केल्याबद्दल बैलवाडा भारतीय जनता पार्टीतर्फे गुलाल उधळून फटाके फोडून मिठाई वाटून जल्लोष साजरा केला.

यावेळी भाजपा अध्यक्ष मनोज उचके,भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष लुकेश भडंग,ऋषि डाखोळे, गोपाल फलके, संजय कापसे, चंपत जुमड़े, राजू काकडे, रोशन राहाटे, दीपक जुमड़े, कल्पेश जुमड़े, योगेश ढोके, शुभम ढोके, रोमित ढोके, मंगेश निस्ताने, शुभम जुमड़े, सचीन निस्ताने उपस्थित होते.

## २ लाखांच्या दागिन्यांवर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

घराला कुलूप असल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत 2 लाख 8 हजार 800 रुपये किंमतीच्या दागिन्यांवर डल्ला मारला. ही घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी भुनेश्वरी विनोद बारापात्रे (34) रा. डी.डी. व्हीला अपार्टमेंट, न्यू मनीषनगर, सोमलवाडाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गत 20 नोव्हेंबरच्या सायंकाळी भुनेश्वरी परीक्षेसाठी भंडारा येथे गेल्या होत्या. घरी त्यांच्या सासू एकट्या होत्या. दरम्यान त्यांच्या सासूही काही कामाने घराला कुलूप लावून बाहेर गेल्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील 2,08,800 रुपये किंमतीचे सोन्याचांदीचे दागिने चोरी करून पसार झाला. दुसऱ्या दिवशी सासू घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेबाबत भुनेश्वरी यांना माहिती दिली. शुक्रवारी भंडारा येथून परतल्यानंतर भुवनेश्वरी यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# न्यु मंगलधाम सोसायटीत समीर मेघे यांची विजयी रॅली



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

महायुतीमधील भाजपाचे उमेदवार समीर मेघे यांनी हिंगणा मतदारसंघात हॅट्रीक केल्याबद्दल स्थानीक न्यु मंगलधाम सोसायटीमधुन शिव सांस्कृतीक मंडळाचे अध्यक्ष तथा भाजपा वाडी मंडळाचे उपाध्यक्ष कमल कनोजे यांच्या नेतृत्वात वाडी परिसरातून रॅली काढण्यात आली.

सर्व शिवमंदीरात महाआरती करण्यात आली. यावेळी श्रीकृपा इन्फ्राकॉनचे संचालक जितेंद्र रहांगडाले जितेंद्र रहांगडाले, रामप्रसाद पटले, बापुसाहेब लिमकर, ज्ञानेश्वर चोपडे, सतीश नांदनकर, देवराव खाटीक, विक्रम तिजारे, नितीन अन्नपुर्णे, अरुण सिंह, राकेश शिवनकर, अनिल घागरे, गजेंद्र देवघरे, राजु विश्वकर्मा, चंदु वैद्य, सुकलाल पटले , कैलास अडले, राजु शिवनकर, मूल गाकरे ,विरेंद्र ठाकुर, सुधाकर वानखेडे, मनोज राजुरकर, सुनिल रोकडे, सुरेश विलोणकर, ताराचंद आंबुले,मनोज बांते, रमेश लोंढे, राजु पहुरकर, विनोद घोडे,छोटु रहांगडाले, जतीन कनोजे, शुभम चंदनकर, गणेश गोपाले, धिरज पिल्ले, शाम उघडे, इमरलाल पटले, छतरलाल ठाकरे, श्यामलाल सकलानी, अजय कठाने, रामदयाल रहांगडाले, मदनलाल सुर्यवंशी, बुधराम पटले उपस्थित होते.

# आशिष जयस्वाल यांच्या विजयाचा कन्हान येथे जल्लोष

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २४ :

कन्हान येथे महायुतिचे उमेदवार ॲड. आशिष जयस्वाल यांचा विजयाचा हजारो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्याची अतिबाजी करुन विजय मिरवणुक काढुन विजय जल्लोष साजरा केला.

ॲड.आशिष जयस्वाल यांनी अपक्ष उमेदवार राजेंद्र मुळक यांना २६,७१४ मतांनी पराभुत करुन पाचव्यांदा विजय मिळवुन इतिहास रचला. बुधवार २० नोव्हेंबर ला रामटेक विधानसभा मतदार संघात सर्वाधिक ७१.८० टक्के मतदान झाले होते. वाढता मतदानाचा टक्का कोणाचा बाजुने लागतो याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. शनिवार २३ नोव्हेंबर ला कवि कुलगुरु संस्कृत विद्यापीठ रामटेक येथे सकाळी ८ वाजता पासुन मतमोजणीला सुरवात झाली . पहिल्या फेरी पासुन अठराव्या फेरी पर्यंत आशिष जयस्वाल यांना आघाडी मिळाल्याने त्यांनी १,०७,४१४ मते घेऊन अपक्ष



उमेदवार राजेंद्र मुळक यांना २६,७१४ मतांनी पराभुत करुन विजय मिळला.

निवडणुक अधिकारी प्रियेष महाजन यांनी आशिष जयस्वाल निवडुन आल्याची घोषणा केल्याने कन्हान येथे महायुतिच्या हजारो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाक्याची अतिबाजी करुन गुलाल उधळुन विजय मिरवणुक काढली. आमदार आशिष जयस्वाल विजय मिरवणुकीत सहभागी झाल्याने कार्यकर्त्यांनी मोठ्या पुष्पहाराने स्वागत केले.

मिरवणुक तारसा चौक येथुन काढुन सात नंबर नाका, गहुहिवरा चौक आंबेडकर चौक, गांधी चौक सह आदि विविध मार्गाने भ्रमण करुन मिरवणुकीचे आंबेडकर चौक येथे समापन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला आमदार आशिष जयस्वाल यांनी पुष्प हार अर्पण करुन विनम्र अभिवादन करीत महायुति च्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे, लाडक्या बहीणींचे आणि मतदारांचे आभार व्यक्त केले.

## माजी आमदार रेड्डी यांनी केले नवनिर्वाचित आमदार जयस्वाल यांचे अभिनंदन



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २४ :

विधानसभेच्या निवडणुकीत रामटेक विधानसभा मतदारसंघातून शिवसेना (शिंदे) व महायुतीचे अधिकृत उमेदवार ॲड. आशिष जयस्वाल पाचव्यांदा हे मोठ्या मताधिक्याने निवडून आले.यावेळी रामटेक विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांनी त्यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या सोबत मुलचंद (पप्पु) यादव उपस्थीत होते. तसेच त्यांनी रामटेकसह नागपूर जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# एमबीबीएसच्या चाळीस जागा रिक्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

दत्ता मेघे वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त जागा कायद्यानुसार योग्य व पात्र उमेदवारास भरण्याची परवानगी मागणारी याचिका दत्ता मेघे इन्स्टट्यूट हायर एज्युकेशन ॲण्ड रिसर्चने उच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने कोणताही प्रतिसाद न दिल्याने उच्च न्यायालयाने तीव्र आक्षेप नोंदवला.

त्यानंतर लगेचच रिक्त जागा भरण्याबाबतचे वेळापत्रक विभागाने सादर केले. ज्यात एमबीबीएस, बीडीस आणि बीएससी नर्सिंगच्या रिक्त जागांवर अखिल भारतीय कोट्याअंतर्गत प्रवेश घेतले जातील असे नमूद केले. महत्त्वाचे म्हणजे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे सचिव आणि आरोग्य विज्ञान महासंचालनालयाने एमबीबीएसच्या कुटुंब कल्याणकडून वेळापत्रक जाहीर ४० जागा रिक्त असल्याची माहिती दिली आहे. विभागाकडून न्यायालयाला सांगण्यात आले की, एमबीबीएस, बीडीएस आणि बीएससी नर्सिंगच्या रिक्त जागांसाठी विशेष फेरी घेण्यात येत असून, २३ नोव्हेंबरपर्यंत ऑल इंडिया कोट्यानुसार प्रवेश स्वीकारले जातील. तसेच २५ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर या कालावधीत राज्य कोट्यातून प्रवेश निश्चित केले जातील. अखिल भारतीय कोट्यातून प्रवेश घेणारे विद्यार्थ्यांचे ३० नोव्हेंबरपर्यंत आणि राज्याच्या कोट्यातून ५ डिसेंबरपर्यंत प्रवेश निश्चित होती. दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने याचिका निकाली काढली. एमबीबीएसच्या रिक्त जागा भरण्यासाठी कोणती पद्धत अवलंबली जाणार हे उघड करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

# "कर्मयोगिनी अहिल्याबाई होळकर" एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कर्तृत्वाची, निष्ठेने आणि अत्यंत कुशलतेने केलेल्या राज्यकारभाराची तसेच धर्माधिष्ठित न्यायव्यवस्थेने कार्य करण्याची गाथा सर्वांना पुन्हा एकदा कळावी या उद्देशाने मानिनी बहुउद्देशीय संस्था निर्मित आणि नटराज आर्ट्स ॲण्ड कल्चर सेन्टर नागपूर द्वारा प्रस्तूत "कर्मयोगिनी अहिल्याबाई होळकर" या एकपात्री प्रयोगाचे आयोजन रविवार दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता धरमपेठ येथील नटराज आर्ट्स ॲड कल्चर सेन्टर येथे केले आहे. याचे लेखन डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांनी केले असून, याचे सादरीकरण नागपुरातील जाणत्या अभिनेत्री डॉ. दीपलक्ष्मी दिलीप भट करणार आहे. दिग्दर्शन, नेपथ्य स्वप्निल बोहटे यांचे असून, संगीत अनिल इंदाणे यांचे आहे तर प्रकाशयोजना वैदेही चवरे यांची असेल. कार्यक्रमाला धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उल्हास औरंगाबादकर विशेषत्वाने उपस्थित राहणार आहेत. अत्यंत प्रभावीपणे सादर होणाऱ्या या सादरीकरणाला रसिक प्रेक्षकांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आयोजकांनी आव्हान केले.

## आजारपण दूर करण्याच्या नावावर चुना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

दोन अज्ञात आरोपींनी आजारपण दूर करण्याची थाप मारून एका महिलेचे दागिने लुटले. ही घटना कोराडी ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी विजय गजानन साखरवाडे (50) रा. पवनसूत सोसायटी, आर्यनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गत 20 नोव्हेंबरच्या दुपारी 12.30 वाजताच्या सुमारास विजय यांची पत्नी घरी काम करीत होती. या दरम्यान परिसरात दोन अज्ञात लोक नंदी बैल घेऊन दान मागण्यासाठी आले. त्यांनी विजयच्या मुलीला नंदीसाठी पोळी आणण्यास सांगितले. त्याच दरम्यान विजय यांची पत्नीही बाहेर आली. आरोपींनी विजय यांच्या पत्नीला आजारपण दूर करण्याची बतावणी केली. पूजा-पाठ करण्याच्या नावावर 33 हजार रुपये किंमतीचे दागिने घेतले आणि फरार झाले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

# शहीद गोवारी बांधवांना विनम्र श्रद्धांजली



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २४ :

आपल्या न्याय हक्काच्या मागणीसाठी गोवारी बांधवांनी इ. सन 1994 साली, नागपूरच्या विधिमंडळावर मोर्चा काढलेला होता. दुर्दैवाने त्या मोर्चामध्ये चंद्राचेंगरीत 114 गोवारी बांधव मृत्युमुखी पडले. आज दिनांक 23 नोव्हेंबर रोजी, त्यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने दीक्षाभूमी स्मारक समिती तर्फे समितीचे विश्वस्त विलास गजघाटे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह श्रद्धांजली अर्पित केली. आज पावतो त्या उपेक्षित गोवारी बांधवांना न्याय मिळाला नाही. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या न्याय पूर्ण मागण्यासह गांभीर्य पूर्ण मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्या मागण्या पूर्ण कराव्या अशी मागणी याप्रसंगी केली.

यावेळी दीक्षाभूमी परिवारातील प्रभाकर दुपारे, शरद मेश्राम, अनिल अवस्थी, देवाजी रंगारी, मधुकर मेश्राम, कैलास राव, वीरेंद्र दहीकर इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मजुरावर प्राणघातक हल्ला

**नागपूर :** अज्ञात आरोपीने एका मजुरावर दगड आणि विटांनी हल्ला करून गंभीर जखमी केले. ही घटना जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत घडली. ललित शंकर मडावी (35) रा. बाराखोली, इंदोरा असे जखमीचे नाव असून त्याच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी सायंकाळी 4.40 वाजताच्या सुमारास ललित नारा गावातील रसोई हॉटेलजवळून जात होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने त्यांचा मार्ग अडवला. कोणताही वाद नसताना ललितवर दगड आणि विटांनी हल्ला चढवला. डोके आणि चेहऱ्यावर वार करून रक्तबंबाळ केले आणि पळून गेला. घटनेची माहित मिळताच जरीपटका पोलिस घटनास्थळी पोहोचले. गंभीर जखमी अवस्थेत ललितला उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले. त्याची प्रकृती नाजूक असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीवर जिवे मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# एमपीएससी तर्फे संभाव्य वेळापत्रक जाहीर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. २४ :

स्पर्धा परीक्षांची तयारी उमेदवारांना योग्यरितीने करता यावी, परीक्षांचा अंदाज यावा यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) दरवर्षी संभाव्य वेळापत्रक प्रसिद्ध केले जाते.

त्यानुसार एमपीएससी तर्फे १६ परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक शुक्रवारी जाहीर केले. यात राज्यसेवा पूर्व परीक्षा ही सप्टेंबर २०२५ मध्ये होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मात्र, २०२४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या बहूतांश परीक्षांचे निकाल, मुख्य परीक्षा अद्यापही झालेल्या नसल्याने २०२५चे संभाव्य वेळापत्रक म्हणजे गाजर दाखवण्याचा प्रकार ठरणार आहे.

एमपीएससी कडून मागील काही वर्षांपासून परीक्षांच्या वेळापत्रकाचे पालन होत नसल्याचे दिसून येते. २०२४ च्या परीक्षांचे वेळापत्रकही विस्कळीतच आहे. २०२४ या वषातील अनेक पूर्व परीक्षा आणि काही परीक्षांचे निकाल रखडले आहेत.

त्यामुळे उमेदवारांचे पूर्ण वर्ष वाया गेले आहे. आयोगाकडून २०२५ चे वेळापत्रक जाहीर होण्यास विलंब झाला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांची चिंता वाढली होती. त्यानंतर आयोगाने शुक्रवारी वेळापत्रक जाहीर केले. यामध्ये १६ परीक्षांचा समावेश असून यात संयुक्त आणि राज्यसेवा परीक्षेचा समावेश आहे. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षेची जाहिरात जानेवारी २०२५ मध्ये येणार असून परीक्षा सप्टेंबर २०२५ मध्ये होण्याची शक्यता आहे.

यात ९ राजपत्रित सेवांचा समावेश राहणार आहे. तर मुख्य परीक्षेची तारीख स्वतंत्रपणे होणार आहे. २०२४ मध्ये जाहीर झालेल्या विविध परीक्षांचे निकाल आणि परीक्षाही लांबल्या आहेत. एमपीएससीच्या दिरंगाईमुळे २०२४ मध्ये जाहीर झालेल्या बहूतांश परीक्षा मे २०२५ पर्यंत चालणार आहेत. तर काही परीक्षांचे निकाल जाहीर होण्यासही २०२५ उजाळणार आहे. यात राज्यसेवा, संयुक्त परीक्षा, वनसेवा आदींचा समावेश आहे. त्यामुळे आयोगाकडून २०२४चे वेळपत्रकाचे पालन झालेले नसल्याचे दिसून येते.

स्पर्धा परीक्षार्थीच्या आंदोलनाची दखल घेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षा वर्णनात्मक स्वरूपाने घेण्याचा निर्णय २०२५ पासून लागू करण्याची घोषणा केली होती. त्यानंतरही विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम होता. मात्र आयोगाच्या संभाव्य वेळापत्रकानुसार आता २०२५ पासून राज्यसेवा परीक्षा वर्णनात्मक पद्धतीनेच होईल, ही बाब स्पष्ट झाली आहे.

# नागपूरकरांनो सावधान ! शहराची हवा गुणवत्ता ढासळली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला आज होत असताना राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एकीकडे राजकीय वारे वेगाने वाहात असतानाच राज्याच्या उपराजधानीची हवेची गुणवत्ता मात्र पूर्णपणे ढासळली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे नागपूरकरांना आता जपूनच श्वास घ्यावा लागणार आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने गुरुवारी जाहीर केलेल्या हवा गुणवत्ता यादीत महाराष्ट्राची उपराजधानी हवेच्या बाबतीत चक्क दूषित आढळली. राज्यातील इतर शहरांच्या तुलनेत नागपूरची हवा गुरुवारी अत्यंत वाईट होती. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर गुरुवारी राज्यातील शहरांची हवा गुणवत्ता पातळीची आकडेवारी दर्शविण्यात आली.

या आकडेवारीनुसार नागपूर शहराची हवा गुणवत्ता वाईट या वर्गवारीत मोजली गेली. शहराचा हवा गुणवत्ता निदेशांक तब्बल २७२ इतका नोंदवण्यात आला. नागपूर शहराच्या तुलनेत मुंबई, पुणे, नाशिक या शहरांचा हवा गुणवत्ता निदेशांक २०० पेक्षा कमी होत. त्यामुळे हवा गुणवत्तेच्या बाबतीत या शहरांची नोंद ह्लमध्यमह्व या वर्गवारीत होती.

त्यामुळे नागपूरपेक्षा हवा गुणवत्तेत ही शहरे चांगल्या स्थितीत होती. गुरुवारी सायंकाळी सात वाजता हवेची गुणवत्ता तपासणाऱ्या रामनगर केंद्रावर सर्वाधिक हवा गुणवत्ता निदेशांक नोंदवण्यात आला. तब्बल २७२ इतक्या हवा गुणवत्ता निदेशांकाची याठिकाणी नोंद झाली. त्यापाठोपाठ सिव्हिल लाईन येथील केंद्रावर २४२ इतका हवा गुणवत्ता निदेशांक नोंदवण्यात आला.

महालमधील केंद्रावर २३८ इतक्या हवा गुणवत्ता निदेशांकाची नोंद करण्यात आली. तर अंबाझरीतील केंद्रावर २०२ इतका हवा गुणवत्ता निदेशांक नोंदवण्यात आला. दिवाळीत यावर्षी मोठ्या प्रमाणात फटाके फुटले, मात्र त्यावेळी देखील हवेची गुणवत्ता पातळी इतकी खालावलेली नव्हती.

मात्र, दिवाळी संपून अनेक दिवस लोटल्यानंतर शहरातील हवेची गुणवत्ता पातळी इतकी खालावल्याने हे शहर दिल्लीच्या वाटेवर तर नाही ना, अशीही भीती आता व्यक्त केली जात आहे. हिवाळ्यात साधारणपणे हवेची गुणवत्ता पातळी खालावत असली तरी शहरात इतकी पण थंडी नाही. त्यामुळेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीने विचार करायला भाग पाडले आहे. शहरातील हवेची गुणवत्ता पातळी वाईट या वर्गवारीत येत असेल तर तो या शहरातील लोकांसाठी धोक्याचा इशारा आहे.

नागरिकांनी आता योग्य ती खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. विशेषकरून लहान मुले, वयोवृद्ध व्यक्ती आणि श्वासनासंबंधी आजार असलेल्या लोकांनी अधिक काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय


## डिहायड्रेशन टाळण्यासाठी...

वजन कमी करण्यासाठी शरीरातला ओलावा टिकवून ठेवणं गरजेचं असतं. त्यातच उन्हाळ्यात अधिक घाम येत असल्याने द्रव पदार्थांचं प्रमाण वाढवावं लागतं. पाण्यासोबतच शरीराला थंडावा देणाऱ्या म्हणजे पाण्याचं प्रमाण जास्त असणाऱ्या फळं आणि भाज्यांचं सेवन करणंही गरजेचं आहे. उन्हाळ्यात डिहायड्रेशन टाळण्यासाठी कोणत्या पदार्थांचं सेवन करायला हवं याविषयी...

* कलिंगडामध्ये भरपूर पोषक घटक असतात. त्यातच कॅलरी कमी आणि पाण्याचं प्रमाण जास्त असल्यामुळे वजन कमी करणाऱ्यांनी कलिंगड खायला हवं. हृदयाच्या आरोग्याच्या दृष्टीनेही कलिंगड चांगलं असतं.

* स्ट्रॉबेरीत अर्ध्यापेक्षा जास्त पाणी असतं. फायबर आणि 'क' जीवनसत्त्वाचं मुबलक प्रमाण असणाऱ्या स्ट्रॉबेरीचंही सेवन करता येईल.

* 'क' जीवनसत्त्वाने युक्त संत्री उन्हाळ्यात



शरीरातला ओलावा टिकवून ठेवतात. यामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहातं. कोलेस्टरॉलची पातळी कमी करण्यासाठी संत्री खायला हवीत.

काय खाल?

* उन्हाळ्यात काकडी खा. काकडी पाण्यापासून बनलेली असल्याने बरेच लाभ होतात. फ्री रॅडिकल्समुळे होणारं शरीराचं नुकसान भरून काढण्याची क्षमता काकडीमध्ये असते.


* एक कप लेट्यूसमधून शरीराला जवळपास पाव कप पाणी मिळतं. लो कार्ब सँडविचमध्ये लेट्यूस घालून खाता येईल. सॅलेडमध्येही त्याचा समावेश करता येईल.

* उन्हाळ्यात भोपळ्या मिरचीचं सेवन करायला हवं. ही शरीराला थंडावा देणारी भाजी आहे. यात बरेच पोषक घटक आणि जीवनसत्त्वं असतात. वजन कमी करणाऱ्यांनी या भाजीचा आहारात समावेश करायला हवा.

## ब्रॉट्युलिझमविषयी

व्याधी विचार

ब्रॉट्युलिझम हा अत्यंत गंभीर असा आजार आहे. यात रुग्णाला अर्धांगवायूचा झटका येतो. एका विषारी घटकामुळे ही समस्या निर्माण होते. क्लॉस्ट्रिडियम बॉटूलिनम नामक बॅक्टेरियामुळे हा आजार होतो. हे बॅक्टेरिया उघड्या जखमेतून किंवा अर्धवट शिजवलेल्या, साठवून ठेवलेल्या अन्नातून मानवी शरीरात शिरतात. क्लॉस्ट्रिडियम जगभरात आढळतात. मातीत तसंच दूषित पाण्यात त्यांचा वावर असतो. या बॅक्टेरियांची अंडी योग्य पद्धतीने न साठवलेल्या अन्नात वाढतात. हे बॅक्टेरिया विषारी घटकांची निर्मिती करतात. हे दूषित अन्न खाल्यानंतर माणसाला विषबाधा होते. भाज्या, मांस आणि न शिजवलेल्या माशांमध्ये हे बॅक्टेरिया आढळू शकतात. मधातही त्यांचा वास असू शकतो. उघड्या जखमेत शिरलेल्या बॅक्टेरियांनी विषारी घटकांची निर्मिती केली तरी ब्रॉट्युलिझम जडू शकतो. या विकाराचे तीन प्रकार आहेत. त्यात अन्नातून होणारा ब्रॉट्युलिझम, जखमेतून होणारा ब्रॉट्युलिझम आणि इन्फंट ब्रॉट्युलिझम यांचा समावेश होतो. पहिल्या दोन प्रकारांची माहिती वर नमूद करण्यात आली आहे. क्लॉस्ट्रिडियमची अंडी शरीरात गेल्यानंतर निर्माण होणाऱ्या समस्येला इन्फंट ब्रॉट्युलिझम



म्हणतात. ही अंडी माणसाच्या आतड्यात वाढतात आणि विषारी घटकांची निर्मिती करतात. मधात ही अंडी असू शकतात. अशुद्ध मधाच्या सेवनाने इन्फंट ब्रॉट्युलिझम होऊ शकतो.

ब्रॉट्युलिझम कोणत्याही प्रकारचा असला तरी तो जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे रुग्णाला तातडीने उपचार मिळणं गरजेचं आहे. अन्नामार्फत होणारा हा विकार अधिक धोकादायक ठरू शकतो. कारण एकाच वेळी अनेकांच्या शरीरात हा घातक बॅक्टेरिया प्रवेश करू शकतो. या विकाराच्या लक्षणांबद्दल बोलायचं तर गिळायला आणि बोलायला त्रास होणं ही याची प्रमुख लक्षणं आहेत. यासोबत मळमळणं, उलट्या, ओटीपोटात गोळे येणं, तोंड कोरडं पडणं, दुहेरी दिसणं, श्वास घ्यायला त्रास होणं अशी लक्षणं दिसून येतात. हे बॅक्टेरिया शरीरात गेल्यानंतर साधारण आठ ते ३६ तासांमध्ये ही लक्षणं दिसायला सुरूवात होते. काही प्रकरणांमध्ये सहा तासांनीही लक्षणं दिसू लागतात तर कधी दहा दिवसांनंतरही लक्षणं दिसू शकतात. विविध प्रकारच्या चाचण्या करून या विकाराचं निदान केलं जातं. तातडीने उपचार मिळाले तर मृत्यूचा धोका कमी होऊ शकतो. श्वसनसंस्थेचं कार्य ठप्प झाल्याने अशा रुग्णांचा मृत्यू होण्याची शक्यता असते. मात्र गेल्या ५० वर्षांमध्ये या विकाराने मृत्यूला सामोऱ्या जाणाऱ्यांच्या संख्येत बरीच घट झाल्याचं पहायला मिळतं. मात्र या विकाराचा धोका कमी झालेला नाही. त्यामुळे या विकाराची लक्षणं दिसली की तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## काळजी तारुण्यातली...

आरोग्यवेध



विसाव्या वर्षानंतर आयुष्य खऱ्या अर्थाने सुरू होतं. शिक्षण पूर्ण झालेलं असतं. लोकांमध्ये मिसळावं लागतं. कारकिर्दीतलं यश वाट बघत असतं. यशाची प्रत्येक पायरी चढत असताना आपण आपल्या आरोग्याकडे पूर्ण दुर्लक्ष करतो. जंक फूड खातो. कामाच्या बोज्यामुळे झोपेशी तडजोड करतो. आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी आयुष्य पडलंय, हाच विचार तरुणांच्या मनात येतो. मात्र भविष्यात शरीर सुदृढ रहावं या दृष्टीने याच वयात प्रयत्न करावे लागतात. आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी तरुण वयात काय करायला हवं याविषयी...

* आरोग्यतपासणी चाळीशीनंतरच करायला हवी हे गरजेचं नाही. एखादा विकार झाल्यानंतर आपण डॉक्टरांकडे धाव घेतो. त्याऐवजी तुम्ही नियमित आरोग्य तपासणी करून घ्यायला हवी. याच काळात तुम्ही योग्य डॉक्टरची निवड करायला हवी. तुमचं शरीर, आरोग्य जाणून घेणारा डॉक्टर हवा.

* या काळात नियमित व्यायामाला प्राधान्य द्या. दैनंदिन जीवनातलं व्यायामाचं महत्त्व तुम्हाला काही वर्षांनंतर कळेल. धावायला सुरूवात करा. धावण्याचा कंटाळा असेल तर किक बॉक्सिंग क्लासला जा. सायकलिंग ग्रुपचे सदस्य व्हा. वेगवेगळे व्यायाम करत रहा.

* स्वयंपाक करायला शिका. या वयात मुलामुलींना थोडाफार स्वयंपाक करायला जमायला हवं. यामुळे तुम्ही आरोग्यदायी पदार्थांची निवड करू शकता. भविष्यात बाहेरच्या खाण्यासाठी लागणारे बरेच पैसे वाचवू शकता.

* या दिवसात अभ्यास आणि कामाचा प्रचंड ताण असतो. हा ताण कमी करण्याचे उपाय शोधा. पुस्तकं वाचा, गाणी ऐका. मेडिटेशनचं तंत्र शिका.

* रात्रभर काम करून किंवा मित्रमंडळींसोबत हिंडून तुम्ही घरी येता. चार ते पाच तास झोप घेऊन पुन्हा सकाळी कामाला लागता. त्यावेळी त्रास जाणवला नाही तरी कमी झोपेचे पुढे खूप वाईट परिणाम होऊ शकतात. रात्री सात ते आठ तासांची झोप गरजेची आहे हे लक्षात ठेवा. कमी झोपेमुळे तुमचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं.

* त्वचेची काळजी घ्या. तरुण वयात त्वचा उजळ दिसत असली तरी पुरेशा काळजीअभावी तिचा पोत बिघडू शकतो. त्यामुळे उन्हात बाहेर पडताना सनस्क्रीन लावा. झोपण्याआधी मेक अप काढा आणि मॉईश्चरायझर लावून झोपा.

## कॅन्सरच्या झटपट चाचणीसाठी

नवसंशोधन

कॅन्सरचं निदान करायचं तर बऱ्याच चाचण्या कराव्या लागतात. यात बराच वेळ आणि पैसा खर्च होतो. रुग्णाला त्रास होतो तो वेगळाच. आता मात्र फक्त एका तपासणीने कॅन्सरचं निदान होऊ शकेल. आयआयटी मंडीतल्या शास्त्रज्ञांनी हे संशोधन केलं असून पेशींमधल्या पाण्याचं विवरण पाहण्यासाठी त्यांनी फ्लोरोसेंट रंगाच्या नॅनो डॉट्सची निर्मिती केली आहे.



सर्वसामान्य पेशींच्या तुलनेत कॅन्सरग्रस्त पेशींमध्ये पाण्याचं विवरण वेगळ्या पद्धतीने होतं. यामुळे कॅन्सरग्रस्त पेशींची ओळख पटकन पटू शकते. नॅनोडॉटची निर्मिती कार्बनपासून करण्यात आली आहे. या शोधामुळे कॅन्सरची चाचणी झटपट व्हायला मदत होईल.

## असे मिळवा स्वस्त उपचार

दंतारोग्य

दिवसातून दोन वेळा दात घासून आणि व्यवस्थित चूळ भरून दातांचं आरोग्य टिकवता येतं. पण काही समस्या निर्माण झाल्या तर डेंटिस्टकडे जावं लागतं. काही उपायांनी तुम्ही या उपचारांवरचा खर्च आटोक्यात ठेऊ शकता. तुमच्या परिसरातल्या दंततज्ज्ञांकडे लक्ष ठेवा. काही ठिकाणी उपचारांवर सवलती दिल्या जातात. त्याचा लाभ घेता येईल. वैद्यकीय चाचण्यांमध्ये सहभागी व्हा. या ठिकाणी रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. दंतवैद्यक



महाविद्यालयात उपचार घ्या. या ठिकाणी उपचारांचं शुल्क बरंच कमी असतं. इथल्या विद्यार्थ्यांना रुग्णांच्या तपासणीतून अनुभव मिळत असतो. त्यामुळे रुग्णांकडून कमी पैसे आकारले जातात.

## ...म्हणून दिसतं अंधूक

डोळ्यांचं आरोग्य

अंधूक दिसत असेल तर दैनंदिन कामांमध्ये बरेच अडथळे येतात. यामागे फारशी गंभीर न वाटणारी कारणंही असू शकतात. याकडे दुर्लक्ष केलं तर कायमचं अंधत्व येण्याची शक्यता असते. ड्राय आयमुळे अंधूक दिसू शकतं. अनेक कारणांमुळे डोळे कोरडे पडतात. सातत्याने टीव्ही बघणं, मोबाइल, कॉम्प्युटरवर बराच वेळ घालवणं, वाचन या कारणांमुळे डोळे कोरडे होतात. परिणामी, तुम्हाला अंधुक दिसू शकतं.



## गुणकारी भेंडी

आजीबाईंचा बटवा

भेंडीची भाजी अनेकांना आवडते. ही हिरवीगार भाजी आरोग्याच्या दृष्टीनेही लाभदायी आहे. वजन कमी करणारे भेंडीचं सेवन करू शकतात. या भाजीत अगदी कमी कॅलरी असतात. यातल्या फायबरमुळे पचनसंस्थेचं कार्य सुरळीत सुरू रहातं. याचा लो ग्लायसेमिक इंडेक्स शरीरातली रक्ताची पातळी नियंत्रणात ठेवतं. भेंडीत 'क' आणि 'अ' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं.



डोळ्यांच्या आरोग्यासाठी भेंडी खायला हवी. भेंडीत पोटॅशियम असतं तसंच रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचे गुणही या भाजीत असतात. त्यामुळे भेंडी पसंत करणाऱ्यांनी काळजी करू नये.

## स्ट्रॉ वापरताय?



आपण प्लास्टिक स्ट्रॉचा सर्रास वापर करतो. कोल्डड्रिंक असो वा ज्यूस, स्ट्रॉशिवाय आपण ही पेयं पित नाही. मात्र हाच स्ट्रॉ आपल्या आरोग्यासाठी घातक ठरू शकतो.

* कोणतंही पेय स्ट्रॉने प्यायल्यामुळे दातांमध्ये खड्डे पडण्याची शक्यता बरीच वाढते. स्ट्रॉचा नियमित वापर करणाऱ्यांना दातांच्या समस्या सतावू शकतात. स्ट्रॉने ओढून घेतलेलं पेय थेट दातांवर आपटतं. यामुळे एनामेलचा थर कमी होतो आणि दातांची झीज व्हायला सुरूवात होते.

आपण कुठे चुकतो?

* स्ट्रॉमधून फक्त पेयच शोषलं जात नाही तर हवाही शरीरात जाते. याला एअरोफॅजिया असं म्हणतात. ही हवा पचनसंस्थेत शिरकाव करते आणि गॅस, पोटफुगी अशा समस्या निर्माण होतात.

* चेहऱ्यावर पडणाऱ्या सुरकुत्यांमागे स्ट्रॉने पेयं पिणं हे कारण असू शकतं. स्ट्रॉने पेयं पिताना चेहऱ्याची विशिष्ट पद्धतीने हालचाल होत असल्याने तोंडाजवळ सुरकुत्या पडतात.

* स्ट्रॉ बनवण्यासाठी पॉलिप्रॉपेलिनचा वापर केला जातो. हे एक प्रकारचं प्लास्टिक आहे. यातली रसायनं द्रव पदार्थांमध्ये विरघळतात. यामुळे आरोग्यावर बरेच दुष्परिणाम होऊ शकतात.

* स्ट्रॉमुळे शरीरात जास्त साखर जाते. स्ट्रॉने पेयं पिताना अतिरिक्त द्रवपदार्थ शरीरात जातात आणि कॅलरी वाढतात.

## जीम उपकरणांवर टॉयलेट सीटपेक्षा जास्त बॅक्टेरिया

आजकाल बहुतेक तरुण निरोगी राहण्यासाठी जिममध्ये तासन्‌तास घाम गाळतात. जिमला जाणे ही वाईट गोष्ट नाही. जीम केल्याने तंदुरुस्त, निरोगी आणि राहता येते. व्यायाम केल्याने शरीराचे वजन संतुलित राहते. बहुतेक जीम प्रेमी हेल्दी फूड आणि त्यांच्या फिटनेसची पूर्ण काळजी घेतात; परंतु हा अलीकडील अहवाल थोडा निराश करू शकतो. टॉयलेट सीटपेक्षा जिमच्या उपकरणांवर ३६२ पट जास्त बॅक्टेरिया असतात, तर ट्रेडमिलमध्ये सार्वजनिक बाथरूमच्या टॅपपेक्षा ७४ पट जास्त जंतू असतात. ते आरोग्य बिघडवू शकतात. व्यायामशाळेतील उपकरणे वेळोवेळी वेगवेगळे लोक वापरतात. तसेच या काळामध्ये शरीरातून भरपूर घामही वाहत असतो. त्यात अनेक जंतू असतात. हेच कारण आहे की एकमेकांद्वारे वापरल्या जाणाऱ्या जीम उपकरणांच्या पृष्ठभागावर बरेच जीवाणू वाढू लागतात.



व्यायामशाळेच्या उपकरणांच्या पृष्ठभागावर इतर पृष्ठभागांच्या तुलनेत सर्वाधिक जीवाणू असतात. त्यामुळे आरोग्यास अनेक धोके निर्माण होतात. तसेच, बहुतेक बॅक्टेरिया ट्रेडमिल, सायकल आणि जिममधील फ्री वेट्समध्ये आढळतात. कारण ही उपकरणे जिममध्ये सर्वाधिक वापरली जातात. 'फिट रेटेड क्रिएटिव्ह टीम' सदस्य चेल्सी फ्रीबर्न म्हणतात, की जीम उपकरणे सामान्यतः लोकांच्या समुदायाद्वारे वापरली जातात आणि वापरण्यापूर्वी आणि नंतर पूर्णपणे स्वच्छ न केल्यास तिथे बॅक्टेरिया वेगाने वाढू शकतात. घामाघूम झालेल्या व्यक्तीशी हस्तांदोलन करताना हीच समस्या उद्भवते. या सर्व ओळखल्या जाणाऱ्या जीवाणूंपासून त्वचेच्या संसर्गाचा धोका सर्वाधिक असतो. त्यामुळे जीममध्ये जाणाऱ्या लोकांनी स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे, यासाठी जिमची उपकरणे वापरण्यापूर्वी आणि नंतर ती निर्जंतुक केले पाहिजेत. तसेच, व्यायामानंतर हात चांगले धुवावेत. त्यामुळे हानिकारक जीवाणूंचा संसर्ग टाळता येईल. जिममधून बाहेर पडल्यानंतर आंघोळ करावी.

## उपचार प्रोस्टेट ग्रंथींवरचे

आयुर्वेद आणि विकार

पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित समस्या आढळतात. त्यातही पन्नाशीनंतर पुरुषांना ही समस्या जास्त सतावते. सर्वसामान्य प्रोस्टॅस्टिटीसपासून जीवघेण्या प्रोस्टेट कॅन्सरपर्यंत या ग्रंथींशी संबंधित बरेच विकार असतात. त्यावर वेळेत उपचार होणं गरजेचं असतं. प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित विविध प्रकारांनुसार आयुर्वेदात उपचार सांगण्यात आले आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या.



* पित्तदोषांमुळे निर्माण होणारे प्रोस्टेट ग्रंथींशी संबंधित विकार पुनर्नवा, बार्ली आणि खसखस अशा औषधी वनस्पतींच्या सेवनाने आटोक्यात राहू शकतात. या वनस्पतींमध्ये थंडावा देणारे गुणधर्म असतात. यामुळे पित्ताची तीव्रता कमी होते आणि आराम मिळतो.

* वातदोषांमुळे निर्माण होणाऱ्या प्रोस्टेट ग्रंथींच्या समस्या दूर करण्यासाठी सालेप ऑर्किडच्या मुळांचा वापर करावा. यात शरीराचं झालेलं नुकसान भरून काढण्याची क्षमता असते. यासोबतच गुग्गुळ, पुनर्नवा आणि गोक्षुरासारख्या वनस्पतीही लाभदायी ठरतात.

* दालचिनी, गुग्गुळ, आलं, शैलजीत हे औषधी घटक कफदोषांमुळे निर्माण होणाऱ्या समस्या दूर करायला मदत करतात. गुग्गुळात शरीर शुद्ध करण्याचे गुण असतात. त्यामुळे कफदोषांचा प्रभाव कमी होतो.

* प्रोस्टेट ग्रंथींचा आकार वाढल्यानेही बराच त्रास होतो. अशा परिस्थितीत काटेरी किंवा कडवट लेट्यूसचा रस उपयुक्त ठरतो. शैलजीत आणि चरक या औषधी वनस्पतींचा वापरही यासाठी केला जातो.

## व्यायामाने मेंदू तीक्ष्ण

आरोग्यासाठी व्यायाम अत्यंत फायदेशीर आहे. यामुळे शरीर तंदुरुस्त, निरोगी आणि तंदुरुस्त राहते. नुकतेच एका संशोधनातून असे समोर आले आहे, की आठवड्यातून फक्त दोन दिवस व्यायाम केल्याने मेंदू तीक्ष्ण होतो आणि मेंदूशी संबंधित आजार टाळता येतात. शारीरिकदृष्ट्या सक्रिय असण्यामुळे अल्झायमरसारख्या न्यूरोडीजनरेटिव्ह रोगांनादेखील प्रतिबंध होतो. व्यायामामुळे मेंदूचे आजारांपासून संरक्षण होते. आठवड्यातून दोन ते तीन दिवस हलका वर्कआउट केल्यानेही मेंदू निरोगी होऊ शकतो. विशेषतः हिप्पोकॅम्पस आणि टेम्पोरल लोब सारख्या प्रमुख भागांना त्याचा खूप फायदा होतो. यामुळे स्मरणशक्ती वाढते आणि मेंदू सक्रिय होतो. एका अभ्यासात असे आढळून आले की चालणे, सायकल चालवणे यासारखे मध्यम किंवा कठीण व्यायामदेखील मेंदूच्या अनेक भागांना फायदेशीर ठरण्यासाठी पुरेसे आहेत. हे ओसीपीटल आणि पॅरिएटल लोब, हिप्पोकॅम्पस आणि फ्रंटल कॉर्टेक्सला खूप फायदे प्रदान करते. व्यायामादरम्यान सोडली जाणारी प्रथिने मेंदूला निरोगी बनवण्यास मदत करतात. १०,१२५ मेंदूच्या स्कॅनचे विश्लेषण केल्यानंतर, संशोधकांना असे आढळून आले, की व्यायामाचे केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्याही खूप फायदे आहेत.



## वाढत्या प्रदूषणामुळे आयस्ट्रोक

वाढते प्रदूषण शरीराला अनेक प्रकारे हानी पोहोचवते. प्रदूषणाचा डोळ्यांवर गंभीर परिणाम होतो. यामुळे ड्राय आय सिंड्रोम आणि अगदी आय स्ट्रोकसारख्या समस्या उद्भवू शकतात. कोरड्या डोळ्यांमुळे डोळ्यांमध्ये जळजळ, खाज सुटणे आणि वेदना होतात, तर डोळ्यांचा झटका ही धोकादायक स्थिती आहे. हा डोळ्यांचा गंभीर आजार आहे जो डोळ्यांच्या मज्ञातंतूंच्या समस्यांमुळे होतो.



प्रदूषणामुळे डोळ्यांना रक्तपुरवठा करणाऱ्या नसांमध्ये सूज आणि रक्त गोठण्याची शक्यता असते. डोळ्याच्या झटक्याचे दोन प्रकार आहेत. पहिला इस्केमिक आय स्ट्रोक आहे, ज्यामध्ये रक्तवाहिन्या (डोळ्यांच्या शिरा) मध्ये गुठळ्या झाल्यामुळे डोळ्यांना रक्तपुरवठा कमी होतो. दुसरा म्हणजे रक्तस्रावी डोळ्याचा झटका. यामध्ये रक्तवाहिन्या फुटल्याने डोळ्यांना रक्तपुरवठा वाढतो. ही स्थिती डोळ्यांसाठी धोकादायक आहे.

डोळ्यांच्या झटक्यावर उपचार करण्यासाठी औषधे, शस्त्रक्रिया, लेझर थेरपी, ऑक्सिजन थेरपी आणि फिजिओथेरपी वापरली जाते. हा आजार केवळ प्रदूषणामुळेच नाही, तर मधुमेह आणि वाढत्या लठ्ठपणामुळेही होऊ शकतो. डोळा दुखणे, अंधुक दृष्टी, डोळे लाल होणे, डोळ्यांत सूज येणे, डोकेदुखी, मानसिक ताण ही या आजाराची लक्षणे आहेत. डोळ्यांच्या व्यायामामुळे डोळ्यांचे स्नायू मजबूत होतात. डोळ्यांमध्ये आय ड्रॉप्स टाका, यामुळे डोळ्यांची जळजळ होणार नाही.

# देवेंद्र फडणवीसांना आई सरिता यांच्या खास शुभेच्छा

# माझा मुलगा मुख्यमंत्री होणार!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्रातील भाजप आणि महायुतीच्या विजयाचे शिल्पकार मानले जात आहेत. या विजयानंतर देवेंद्र फडणवीस यांना त्यांची आई सरिता फडणवीस यांनी शुभेच्छा दिल्या. माझा मुलगा मुख्यमंत्री व्हावे, ही राज्यातील जनतेची इच्छा असल्याचेही सरिता फडणवीस यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे भारतीय जनता पक्षाचे राज्यातील सर्वात मोठे नेते मानले जातात. त्यांच्या नेतृत्वातच भारतीय जनता पक्ष महाविकास आघाडीच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढली आणि मोठा विजय मिळवला आहे.

भारतीय जनता पक्षाचा हा आजपर्यंतचा सर्वात मोठा विजय मानला जात आहे. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे पुढचे मुख्यमंत्री असतील, अशी देखील शक्यता वर्तवली जात आहे. त्यांच्या नागपूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून देखील देवेंद्र फडणवीस यांनी मोठा विजय मिळवला आहे.

या निकालामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे पुन्हा सीएम पदावर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे त्यांच्यावर सध्या देशभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यात आता त्यांच्या आई सरिता फडणवीस यांनी देखील देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या.



### भाजपा आमदारांचा रेटा

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री पदावरून चर्चा सुरू झाली असता, ज्यांचे आमदार अधिक त्यांचा मुख्यमंत्री असे कधी ठरले नसल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले होते. यावरून सीएम पदावर त्यांचाही डोळा असल्याची चर्चा आहे. तथापि, भाजपाने १३२ जागा जिंकल्याने भाजपालाच मुख्यमंत्री पद मिळावे आणि देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री व्हावेत, असा आग्रह भाजपा आमदारांनी धरल्याचे सूत्रांनी सांगितले.

या निवडणुकीत भाजपाचा स्ट्राइक रेट हा ८४ टक्के पाहायला मिळाला. फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपला तिसऱ्यांदा सर्वाधिक बहुमत मिळाले आहे. त्यामुळे त्यांचे नेतृत्व अबाधित राहिले आहे. उद्धव ठाकरे सोबत नसताना देखील दुसऱ्यांदा देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्ष राज्यातील सर्वात मोठा पक्ष असल्याचे सिद्ध केले आहे.

## शरद पवार राजकारणातून संपले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

विधानसभा निवडणुकीच्या आधी गडचिरोली जिल्ह्यातील राजकीय समीकरणं बदलली. गडचिरोलीतील अहेरीमध्ये मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या विरोधात त्यांचीच लेक भाग्यश्री आत्राम यांना शरद पवारांनी काही उमेदवारी दिली. मात्र तिथे धर्मराव बाबा आत्राम यांचा 16 हजार 814 मतांनी विजय झाला आहे.

भाग्यश्री आत्राम यांना 35 हजार 765 मतं मिळाली आहेत. या निकालावर प्रतिक्रिया देताना अजित पवार गटाचे नेते धर्मराव बाबा आत्राम यांनी शरद पवारांवर निशाणा साधला आहे. शरद पवारांचं राजकारण संपल्याचं धर्मराव बाबा आत्राम म्हणालेत.

शरद पवार यांनी आमच्या घरावर वार केला. लोकांनी त्यांच्या घरावर वार केला. त्यांचं राजकारण संपलं आहे. त्यांची काम करण्याची पद्धत आणि त्यांचं राजकारण संपलं. ते आता आमच्याकडे येतील, असं विधान धर्मराव बाबा आत्राम म्हणाले आहे.

अहेरी मतदारसंघात झालेल्या विजयावर आत्राम यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझा विजय होणारच होता. ते मी आधीच सांगितलं होतं. चौथ्या नंबरवर माझी मुलगी येईल असं मी सांगितलं होतं पण तिसऱ्यावर आली. मी आधीच सांगितलं होतं 200 च्या वर आमच्या महायुतीच्या जागा येतील आणि तसंच झालं आमचं उद्या परवा सरकार स्थापन होईल. त्यांच्या पक्षाचे ते पाहतील ते लढाई झाली आता आम्हाला ४१ जागा मिळाल्या या चांगल्या आहे. आम्ही अपेक्षा केली नव्हती त्यापेक्षा जास्त जागा मिळाल्या, असं धर्मरावबाबा आत्राम म्हणालेत.



सरकारन जाहीर केलेल्या योजनांचा चांगला फायदा झाला, लाडकी बहीण या सगळ्या योजनांचा चांगला फायदा झाला. लोकांनी आम्हाला निवडून दिलं. आता विरोधकांनी पाच वर्षे विरोधी बाकावर बसायचं ते आता बसतील. त्यांचं काम ते करतील आमचं काम आम्ही करू सगळे मोठे मोठे नेते पडले. आता ते कुठेतरी थांबले पाहिजे. आमचे नेते पडतील असं ते बोलत होते मात्र ते निवडून आले, असे आत्राम यांनी म्हटलं आहे.

# दादांनी पूर्ण करून दाखवले चॅलेंज

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई , दि. २४ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्यावेळी शिरूरचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते अशोक पवार यांना भरसभेत चॅलेंज दिले होते. तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय? अशा शब्दांत थेट आव्हान अजित पवारांनी दिले होते. ते चॅलेंज त्यांनी अखेर पूर्ण करून दाखवले.

या विधानसभा निवडणुकीत शरद पवारांनी अशोक पवार यांना शिरूर येथून त्यांना उमेदवारी दिली होती. शरद पवार गटाच्या अशोक पवार यांच्या विरोधात शिरूर येथे अजित पवारांनी ज्ञानेश्वर कटके यांना उमेदवारी दिली होती.

शिरूर विधानसभा मतदारसंघातून ज्ञानेश्वर कटके यांनी 192281 एवढी मते मिळवत दणदणीत विजय मिळवला आहे. तसेच अशोक पवार यांना 117731 मते मिळाली व पराभूत झाले. त्यामुळे अजित पवारांनी दिलेले आव्हान देखील पूर्ण केले असल्याची चर्चा सुरू आहे.





लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी अजित पवारांनी शिरूर लोकसभा मतदारसंघात जाहीर सभा घेतली होती. या सभेत बोलताना शरद पवार गटाचे शिरूरचे आमदार अशोक पवार यांना खुले आव्हान अजित पवारांनी दिले होते. आरे पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय?, अशा शब्दात आव्हान केले होते.

पुढे अजित पवार म्हणाले होते, दिलीप वळसेंचा शपथविधी झाला आणि अशोक पवार यांची सटकली. ते म्हणाले, दादांनी दिलीप वळसे पाटलांना मंत्रिमंडळात घ्यायला नको होते. त्यानंतर अशोक पवार शरद पवार गटात गेले. त्यांना पवार साहेबांनी सांगितले की, पुढच्या वेळेस तुच मंत्री. आरे पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय? आता मी पण चॅलेंज देतो तू आमदारच कसा होतो ते बघतो, असे चॅलेंज त्यांनी दिले होते.

# भिषण अपघात दोन तरूणांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. २४ :

कोंढाळी पोलीस स्टेशन अंतर्गत नांदोरा फाट्यावर २३ नोव्हेंबरच्या मध्यरात्री महागडी थार कार आणि ट्रकमध्ये झालेल्या भिषण अपघातात दोन तरूणांचा मृत्यू झाला तर दोन तरूण सुखरूप बचावले.

मिळालेल्या माहितीनुसार अमरावती जिल्ह्यातील चांदुरबाजार. येथील माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांचे कार्यकर्ते ऋषभ शाम गावंडे (२५), सोपान नितीन कोरडे(२०), अजिंक्य प्रमोद वाकोडे (२५), शुभम संजय खोंड (२८), सर्व राहणार चांदुर बाजार हे २३ नोव्हेंबरच्या रात्री उशिरा १.३० वाजताचे दरम्यान थार वाहनाने (एमएच -२७ - डीएल-८५१३) जवळच्या नातेवाईकांचे लग्न सोहळ्याकरिता नागपूरकडे येत होते.

दरम्यान, नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील कोंढाळी नजिकच्या अपघात प्रवण घटनास्थळ म्हणून कुख्यात नांदोरा फाटा वळणावर वळण घेत असलेला मालवाहू ट्रक आणि महिंद्रा कंपनीच्या आधुनिक थार कारमध्ये झालेल्या धडक झाली. कारमध्ये मागे बसलेले ऋषभ शाम गावंडे, व सोपान नितीन कोरडे यांचा भिषण अपघातात जागीच मृत्यू झाला तर वाहनाचे एअर बॅग उघडल्या गेल्यामुळे अजिंक्य प्रमोद वाकडे, शुभम् संजय खोंड बचावले. या दोघांना वसंतराव देशमुख प्रतिष्ठानच्या रुग्णवाहिकेचे चालक संजय गायकवाड यांनी कोंढाळी प्राथमिक आरोग्य केंद्र व नंतर शासकीय रूग्णालयात नागपूर येथे दाखल केले. कुटुंबियाच्या आग्रहावरून नंतर त्यांना नागपूर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.





मृतक सोपान कोरडे



मृतक ऋषभ गावंडे

या अपघातात थार या चार चाकी वाहनाचा अक्षरशः चूराडा झाला आहे. या भिषण अपघाताची माहिती मिळताच कोंढाळीचे ठाणेदार राजकुमार त्रिपाठी, पीएसआय रोशन खांडेकर, शिपाई वैभव जाधव यांनी घटनास्थळी धाव घेतली व जखमींना रुग्णालयात पाठविण्यात आले . दोन्ही तरूणांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी काटोल ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी बापूसाहेब रोहम यांच्या मार्गदर्शनाखाली रोशन खांडेकर तपास करीत आहेत.

या अपघातात छार झालेले दोन्ही तरूण कारच्या मागच्या भागात बसले होते. या भागात एयर बॅग नसल्याचे समजते. परिणामी त्या दोन्ही युवकांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. एअर बॅग उघडल्याने चालक आणि शेजारी बसलेला तरूण बचावला.

### बच्चूभाऊ घटनास्थळी दाखल

प्रहार संघटनेच्या कट्टर कार्यकर्त्यांचा भिषण अपघातात मृत्यू झाल्याची माहिती मिळताच माजी मंत्री बच्चूभाऊ कडू, काटोलचे प्रहारचे नेते आशिष जयस्वाल व दिनेश निंबाळकर सह घटनास्थळी पोहचले. घटनास्थळाची पाहणी करून काटोल ग्रामीण रूग्णालयात त्यांनी भेट दिली. शवविच्छेदनानंतर मृतदेह त्यांच्या चांदुर बाजार या मुळ गावाकडे रवाना केले तसेच गंभीर जखमींची विचारपुस करण्यासाठी नागपूर येथील खाजगी रुग्णालयात भेट दिली.



लोकार्थ

## एएनएमआय स्टॉकटेक अहवालानुसार स्टॉक ब्रोकर्सची अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक

स्टॉक ब्रोकिंग क्षेत्रातील ८३.६% स्टॉक ब्रोकर्सने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये त्यांचे आयटी बजेट वाढवण्याची योजना आखली आहे. त्यापैकी ४१.८ टक्के ब्रोकर्सने २० टक्के वाढीचे लक्ष्य ठेवले आहे. भारतातील सर्वात मोठ्या अखिल भारतीय स्टॉक ब्रोकर्सची संस्था असलेल्या असोसिएशन ऑफ नॅशनल एक्स्चेंज मेंबर्स ऑफ इंडिया वेस्टर्न रीजन (एएनएमआय डब्ल्यूआयआरसी), आज त्यांच्या वार्षिक स्टॉकटेक २०२४-२५ सर्वेक्षण अहवालाची घोषणा केली.

या अहवालामध्ये स्टॉक ब्रोकर्सच्या तंत्रज्ञानातील गुंतवणुकीविषयी महत्त्वपूर्ण निष्कर्ष दिले आहेत.

सर्व्हेनुसार, ८३.६% स्टॉक ब्रोकर्सची २०२४-२५ मध्ये त्यांच्या आयटी बजेटमध्ये वाढ करण्याची योजना आहे. यामध्ये ४१.८% ब्रोकर्स २०% किंवा त्यापेक्षा जास्त वाढीचे लक्ष्य ठेवले आहे. या गुंतवणुकीचा मुख्य उद्देश सुरक्षा, सोपेपणा आणि स्केलेबिलिटीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आहे. त्यात अल्गोरिदमिक ट्रेडिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि ब्लॉकचेनसारख्या तंत्रज्ञानांचा समावेश आहे. ब्लॉकचेनः ७.१% ब्रोकर्स पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी ब्लॉकचेनचा वापर करत आहेत.सुरक्षा आणि साधेपणाः सुरक्षा बाबत ८४.८% ब्रोकर्स महत्त्वपूर्ण धोरणे अंगिकारत आहेत. यामध्ये सायबर सुरक्षा आणि जोखीम व्यवस्थापनाचे जास्त महत्त्व दिले गेले आहे. ■ ■

## रेलिगेअर ब्रोकिंगचा कॉर्पोरेट भागीदार म्हणून इंडियासोबत सामंजस्य करार

भारतातील सिक्युरिटीज फर्मपैकी एक असलेल्या रेलिगेअर ब्रोकिंग लि. ने FPSB इंडियासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे, ती आपली वचनबद्धता मजबूत करण्यासाठी अधिकृत कॉर्पोरेट भागीदार म्हणून सामील झाली आहे. FPSBIndia ही आर्थिक नियोजन व्यवसायासाठी जागतिक मानकनिर्धारण संस्था आणि आंतरराष्ट्रीय प्रमाणित वित्तीय योजनाकार (CFP®) प्रमाणन कार्यक्रमाची मालकी फायनान्शियल प्लॅनिंग स्टँडर्ड्स बोर्ड लिमिटेड (FPSBLtd.) ची भारतीय उपकंपनी आहे.

एसीपी असणे ही उत्कृष्टतेची खूण आहे, ज्या कॉर्पोरेट्सना आर्थिक सेवा वितरणात सर्वोच्च मानके राखतात त्यांनाच हा पुरस्कार दिला जातो. रेलिगेअर ब्रोकिंग आणि FPSB इंडिया यांच्यातील ही भागीदारी उच्चगुणवत्तेच्या वित्तीय सेवा प्रदान करण्यासाठी आणि संपूर्ण भारतामध्ये आर्थिक साक्षरतेला प्रोत्साहन देण्यासाठी सामायिक वचनबद्धतेला अधोरेखित करते. ■ ■

भारतातील आघाडीची बहुराष्ट्रीय ऑटोमोबाईल उत्पादक कंपनी टाटा मोटर्सने आपला पहिला ऑटोमेटेड मॅन्युअल ट्रान्समिशन ट्रक, Tata Prima 4440.S AMT, सौदी अरेबियामध्ये लॉन्च केला. त्याच्या फ्लॅगशिप प्लॅटफॉर्मवर आधारित, Prima 4440.S AMT कंपनीच्या जागतिक कौशल्याने अतुलनीय विश्वासार्हता आणि कार्यप्रदर्शन प्रदान करण्यासाठी तयार केले आहे. शक्तिशाली ड्राईव्हट्रेन, मजबूत समुच्चय आणि आरामदायी केबिनने सुसज्ज, नवीन ट्रक ड्रायव्हर आराम आणि इंधन कार्यक्षमतेचे उत्तम प्रकारे मिश्रण करून त्याच्या ग्राहकांना उच्च उत्पादकता आणि नफा देते.

### रेलिगेअर ब्रोकिंगचा कॉर्पोरेट भागीदार म्हणून FPSB इंडियासोबत सामंजस्य करार

याव्यतिरिक्त, टाटा मोटर्सने दम्माम येथील हेवी इक्विपमेंट अँड ट्रक्स शोमध्ये त्यांची पाच उच्च-कार्यक्षमता उत्पादने प्रदर्शित केली, जी देशाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विविध प्रकारच्या अनुप्रयोगांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन आणि इंजिनिअर केलेली आहेत.

टाटा मोटर्सच्या HEAT शो पॅव्हेलियनचे अनावरण करताना, अनुराग मेहरोत्रा, हेड, टाटा मोटर्स कमर्शियल व्हेइकल्स, म्हणाले, ह्लसौदी अरेबिया हा टाटा मोटर्ससाठी एक महत्त्वाचा प्रदेश आहे, जिथे आम्ही अभिमानाने मजबूत उपस्थिती प्रस्थापित केली आहे आणि अनेक दशकांपासून ग्राहकांना सेवा देत आहोत. राज्यामध्ये जलद परिवर्तन होत असताना, आम्ही आमच्या प्रगत उपायांसह त्याच्या विकसित गतिशीलतेच्या गरजांना समर्थन देण्यासाठी वचनबद्ध आहोत. ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## रणजितसिंह मोहिते पाटलांची हकालपट्टी करा

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. २४ :

रणजितसिंह मोहिते पाटील यांनी पूर्ण ताकदिने भाजपविरोधात काम केल. पक्षाच्या पराभवासाठी पैसे वाटले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी पोलिंग एजंटला धमक्या दिल्या. त्यामुळे रणजितसिंह मोहिते पाटील यांची तात्काळ भाजपमधून हकालपट्टी व्हावी, असा गंभीर आरोप भाजप नेते व माजी आमदार राम सातपुते यांनी विधान परिषदेचे आमदार मोहिते पाटील यांच्यावर केला आहे.

राम सातपुते म्हणाले, आपला निसटता पराभव झाला. कार्यकर्ता लढला, भल्याभल्यांना नडला. भाजप कार्यकर्त्यांना धमक्या दिल्या, मारहाण झाली.भाजपाने ज्या रणजितसिंह मोहिते पाटलांना आमदारकी दिली, साखर कारखान्याला आर्थिक बळ दिले, संपूर्ण ताकद दिली त्या रणजितसिंह मोहिते पाटील यांनी पूर्ण ताकदिने भाजपविरोधात काम केल. पक्षाच्या पराभवासाठी पैसे वाटले असल्याचा आरोप राम सातपुते यांनी केला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस मतदारसंघात भाजपचे उमेदवार राम सातपुते यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादीचे उत्तम जानकर निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. येथील लढत अत्यंत चुरशीची झाली, मात्र अखेर राम सातपुते यांचा पराभव झाला आहे.

## मनसेच्या एकमेव आमदाराचा पराभव

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई , दि. २४ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे एकमेव आमदार राजू पाटील यांचा कल्याण ग्रामीण या विधानसभा मतदारसंघात पराभव झाला आहे. त्यामुळे मनसेचा एकमेव आमदार देखील आता राहिला नाही, याचा मोठा धक्का राज ठाकरे यांना बसला आहे.

या पराभवानंतर राजू पाटील यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. निकाल येतील जातील, आपले प्रेम, आपले ऋणानुबंध कायम राहतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे



राजू पाटील यांनी एक्सवरील पोस्टमध्ये जनतेला उद्देशून म्हणले की, निकाल येतील जातील, आपले प्रेम, आपले ऋणानुबंध कायम राहतील. गेली ५ वर्ष तुम्ही अपेक्षेपेक्षा खूप जास्त प्रेम दिले, असे त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले आहे.

## नेत्यांची एकही सभा न घेता विजयश्री


■ वृत्तसंस्था, हिंगोली, दि. २४ :

संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या कळमनुरी विधानसभा मतदार संघात शिंदेसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी वरिष्ठ नेत्यांची एकही सभा न घेता कार्यकर्त्यांच्या सोबतीने विजयाचा इतिहास रचला.

दुसरीकडे मात्र खुद्द शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांची सभा झाल्यानंतरही त्यांची नेते मंडळी विधानसभेत निष्प्रभ ठरली आहेत. तर दुसरीकडे वसमत विधानसभेतही राष्ट्रवादीचे राजेश नवघरे यांनी मतदारांच्या गाठीभेटीवरच भर देत विजय मिळविला.

राज्यात शिवसेनेच्या फुटीनंतर सर्वात जास्त चर्चा कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांची झाली होती. सुरवातीला ठाकरे गटात राहण्याचे आश्वासन दिलेल्या बांगर यांनी दोनच दिवसांत शिंदेसेनेत प्रवेश केला. त्यामुळे त्यांच्या भुमीकेवर चांगलीच टिका होऊ लागली होती. शिवसेनेचे पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत कळमनुरीत सभा घेऊन बांगर यांच्यावर तोफ डागली होती.





दरम्यान, विरोधकांच्या एकाही टिकेला उत्तर न देता आमदार बांगर यांनी नेत्याच्या सभेत वेळ घालवण्या ऐवजी गाव भेटीवर भर दिला. योग्य नियोजन केले आणि विजयश्री खेचून आणली.